काळजी लागून राहिली होता. त्यांच्याकडे मुख्यतः तीन कामे होतीं. संस्थानच्या पैशांच्या जमाखर्चाचें काम, कै. श्री. अण्णा चिंचणीकर यांनीं श्री समर्थ बाबांना अर्पण केलेल्या आपल्या स्थावर जंगम मिळकतीच्या व्यवस्थेचे काम, व श्री साईलीलेचे काम. हीं तिन्ही कामें ते फार सचोटीने, सरळपणानें, व भक्तियुक्त अंतःकरणानें करीत. ते आपल्या कामांत कधींही आळस, उडवाउडव अगर हयगय करीत नसत. ही सर्व सेवा बाबाची असें समजून हीं तिन्ही कामे ते जिवापाड मेहनत करून करीत. बाबांच्या ठिकाणीं त्यांची भक्ति निस्सीम व अलोट होती यांत शंका नाहीं. अलीकडे ५-६ वर्षें त्याच्या बरोबर काम करण्याची संधि मला मिळाली हे माझे महद्भाग्य मी समजतों. त्यामुळे त्यांचे ठिकाणीं असलेल्या शांति, भूतदया, परोपकार, आर्जव, तितिक्षा, चिकाटी, हुरूप, व गुरुभक्ति आदिकरून मोक्षैक फळ देणाऱ्या सात्विक गुणाचा विकास होत चाललेला मला चांगलाच पाहावयास मिळे.

ते कोणाबद्दल केंव्हां चुकूनही विरुद्ध बोलत नसत. व आपण बोलूं लागलों तर तसें बोलण्याबद्दल ते आपल्यास दोष देत, व मोडून काढीत. ते कधीं रागावत नसत. व रागावलेच तर त्याच्या रागांत अनुराग असे. बाबाच्या सर्व भक्तांबद्दल त्यांना प्रेम, कौतुक व आदर वाटे. बाबाचे कामांत ते अगदीं चोख व फार दक्ष असत. त्या करितां त्यांना कितीही श्रम पडले तरी त्याची ते पर्वा करीत नसत.

अण्णासाहेबानीं श्री सांईसच्चरिताचे अध्याय लिहिण्याचे पूर्वी त्याचे ठिकाणीं कवित्व शक्ति होती हे मला माहीत नव्हते त्यांनीं श्री सांईसच्चरिताचे एकदर ५२ अध्याय लिहिले आहेत व ते श्री साईलीलेच्या पहिल्या वर्षाच्या १ ल्या अंकांपासून ६ वे वर्षाच्या १–२ ऱ्या अंकापर्यंतच्या अंकांमधून प्रसिद्ध केले आहेत. हे चरित्र त्यांनीं श्री बाबाच्याच कृपेने व आज्ञेने लिहिले असल्यामुळें उत्तम कवीच्या अगीं जरूर असणाऱ्या मुख्य गुणापैकीं प्रसाद, गुरुभक्ति, व अध्यात्म निरूपण हे गुण त्याच्या कवितेत उत्कृष्ट रीतीने दृष्टीस

* श्री साईलीला अंक २ व ३ आणि १३ वे शतकातील.

पडतात. हे अध्याय ओंवीप्रबंधांत लिहिले आहेत. यांत बाबांच्याच लीला वर्णिल्या आहेत, पण त्याना भक्ति, वैराग्य व ज्ञान याची चटकदार व गोड अशी जोड दिली आहे. त्यामुळे ते अध्याय वाचतांना आपण ब्रह्मरसाचें मधुर पान करीत आहोंत असेच वाचकांस वाटते. काकासाहेब दीक्षितांचे मुखांतून सतत २-३ वर्षें श्री एकनाथी भागवत श्रवण केल्यामुळे व स्वतःही त्या ग्रंथराजाचीं पुष्कळ पारायणें केलीं असल्यामुळे त्यांच्या कवितेवर श्री एकनाथ महाराजाच्या शब्दरचनेची पुष्कळच छाप पडलेली आहे असें श्री एकनाथी भागवत वाचणारास सहज दिसून येईल. आणि म्हणूनच विद्वद्-रत्न श्रीयुत रावबहादूर नानासाहेब वैद्य यांनीं अण्णासाहेब हे श्री सांईसच्चरि-तास दुसरे महिपतीच लाधले आहेत असे म्हटले आहे. ( श्री सांईलीला वर्ष २, अंक ९, पान १५२ पहा. )

अण्णासाहेबांची काव्यप्रतिभा उज्ज्वल होती हे वरील विवेचनावरून दिसून येईल; परंतु ओंवीप्रबंधांत लिहिलेल्या श्रीसांई सच्चरित ग्रंथाखेरीज इतर ग्रंथ अगर कविता ओंवी अगर इतर वृत्तांत त्यांनीं केलेली माझे पाह-ण्यात किंवा ऐकण्यांत नाहीं. असेल तर ती श्रीसाईलीलेत प्रसिद्ध करण्याची तजवीज त्यांचे चिरंजीव व जामात यांनीं करावी अशी माझी त्यांना नम्र विनंती आहे.

बाबांनीं अण्णासाहेबांस प्रथमदर्शनींच "हेमाडपंत" ही संज्ञा दिली. ( श्री सांईलीला वर्ष १, अंक २, ओंव्या १५०, १६५ व १६६ पहा. ) मला वाटतें ही संज्ञा अन्वर्थ व भविष्य सुचविणारी होती. हेमाद्री उर्फ हेमाडपंत हे देवगिरीचे यादव वंशांतील महादेव व रामदेव या राजांचे कार-कीर्दीत त्यांचे मंत्रि होते. ते प्रख्यात ग्रंथकार होते. त्यांचे धार्मिक ग्रंथ हल्लींही प्रचलित आहेत. ते धार्मिक, विद्वान् व सुशील होते. जमाखर्चाच्या व हिशो-बाच्या पद्धती त्यांनीं प्रचारांत आणल्या. दरबारचे कागदपत्र ठेवण्याचें व हिशोब पाहाण्याचे काम त्यांचेकडे होते. हेमाडपंत हे नांव देऊन बाबांनीं शिरडी संस्थानच्या दरबारचे कागदपत्र, हिशोब, व जमाखर्च तुम्हांस पुढें

ठेवावे लागतील व भक्ति, ज्ञान, व वैराग्य यांनीं ओथंबलेला श्रीसांईसच्चरितासारखा सर्वमान्य ग्रंथ तुमच्चेच हातून होईल असे भविष्य कथन केले असे मला वाटते. कारण हें भविष्य अक्षरशः खरें झाले आहे.

श्री सरस्वती गंगाधर साखरेकृत हल्लीं जगविख्यात प्रचलित असलेल्या श्रीगुरु चरित्राचे ५२ अध्याय असून त्याची ओंवीसंख्या ७३०० आहे. श्री सरस्वती गंगाधर यांनीं हे चरित्र गुर्वाज्ञेकरून लिहिलें आहे. अण्णासाहेबांनीं लिहिलेल्या श्री सांई सच्चरिताचे अध्यायही ५२ आहेत. त्यांची ओंवीसंख्या मात्र ९२४५ आहे. अण्णासाहेबांनींही हे चरित्र श्रीबाबांच्या आज्ञेवरूनच लिहिलें आहे. सरस्वती गंगाधरांच्या गुरुचरित्राचा जसा लोक सप्ताह करितात तसा या सांईसच्चरिताचा सप्ताह करितां यावा म्हणून या बावन अध्यायांचे एक निराळेच पुस्तक तयार करून त्याची किंमत माफक ठेवावी असें काहीं बाबांच्या भक्तांनीं अण्णासाहेबांस सुचविले होतें. अण्णासाहेबांचीही तशीच इच्छा होती व त्याप्रमाणें त्यांचा प्रयत्नही सुरू होता. श्रीसांईलीला निरंतर चालू ठेवावी ही त्यांची दुसरी इच्छा होती व कै. अण्णासाहेब चिंचणीकर यांनीं बाबांना अर्पण केलेल्या आपल्या मिळकतीच्या व्यवस्थेसंबंधानें त्यांनीं लिहिलेले सविस्तर हकीकतीचे प्रोसीडिंग श्रीसाईलीलेंत प्रसिद्ध करावें ही त्यांची तिसरी इच्छा होती. ह्या अपूर्ण राहिलेल्या त्यांच्या इच्छा शिर्डी संस्थानचे हल्लींचे चालक पूर्ण करतील अशी मला बळकट आशा आहे.

मला वाटतें अण्णासाहेबांच्या ५२ अध्यायांचे खालीं लिहिल्याप्रमाणे ७ भाग केल्यास सप्ताह करण्यास सुलभ जाईल.

| दिवस | अध्याय संख्या | | ओंवीसंख्या |
|---|---|---|---|
| १ | १ ते ८ | ८ | १३०० |
| २ | ९ „ १६ | ८ | १३६३ |
| ३ | १७ „ २३ | ७ | १२८८ |
| ४ | २४ „ ३१ | ८ | १३३७ |

| दिवस | अध्याय संख्या | | | | ओवीसंख्या |
|---|---|---|---|---|---|
| ५ | ३२ | ,, | ३७ | ६ | १२०२ |
| ६ | ३८ | ,, | ४५ | ८ | १३९३ |
| ७ | ४६ | ,, | ५२ | ७ | १३६२ |
| | | | | ५२ | ९२४५ |

सर्व गृहस्थाश्रमी दूरदृष्टीच्या पुरुषांप्रमाणें अण्णासाहेबांनीं आपल्या कुटुंबांतील माणसांकरितां त्याच्या चरितार्थाची कांहीं तरी तरतूद करून ठेवली असेलच. व तसें करणे रास्त व इष्ट आहे. परंतु त्यानीं बाबांच्या सर्व लहानथोर स्त्रीपुरुष भक्तांकरितां आपल्या शुद्धाचरणादर्शरूपीं, व तसेच द्विपंचाशत् श्री साईसच्चरित अध्यायरूपीं जो अप्रतिम, बहुमोल, व मिष्ट असा ठेवा ठेविला आहे त्याचा आम्ही शुद्ध बुद्धीनें व नित्य आठवणीने मनन करून जर आस्वाद घेत गेलों तर आमचेही परम कल्याण झाल्या-वांचून राहाणार नाहीं अशी माझी अल्प समजूत आहे.

“ स्वहिता कारणे आपला आपणच विचार करूंया ”

या प्रसिद्ध संतवर्य श्री शिवरामस्वामी यांच्या उक्तीप्रमाणे आपल्या हिताचा विचार आपणच केला पाहिजे. त्याकरिता सद्गुरूची काय आवश्यकता आहे ? सद्गुरूच्या हातांत आहेच काय ? अशा प्रकाराचीं मते सन १९०९-१० सालापर्यंत अण्णासाहेबांचीं होतीं. ते स्वभावतः पहिल्यापासून दयाशील, शांत, परोपकारी, परदुःखेन दुःखित व आनंदी अशा स्वभावाचे होते. तथापि ते संतप्रेमी नव्हते. सद्गुरूवर तर त्यांचा मुळींच भरंवसा नव्हता. स्वकर्तृत्वाचा अहंकार त्यांचे ठिकाणीं विशेष होता. परंतु ह्या अहंकार जंबुकाची गर्जना जावत्कालपर्यंत संतकेसरीची नजरानजर झाली नाहीं तावत्कालपर्यंतच टिकते. अण्णासाहेबांचीही स्थिति अशीच झाली. बाबांचे दर्शन होण्यापूर्वी शिरडींत येऊन सद्गुरूंच्या अनावश्यकतेबद्दल जो कांहीं मंडळीबरोबर वितंड-वाद करीत होते व अहंकारयुक्त कुत्सित बुद्धीने जी ते सद्गुरूची अवहेलना

करीत होते, ह्या दोन्ही गोष्टी बाबांचीं व त्यांची नजरानजर होऊन बाबांच्या मुखांतून कांहीं खुणेचे शब्द त्याचे कर्णपुटात शिरल्याबरोबर जागच्या जागींच थांबल्या, त्याचा अहंकार ताबडतोब विगलित झाला; कुबुद्धि मावळली. वितंडवाद देशोधडीस चालता झाला. बाबांच्याबद्दल प्रेम उत्पन्न होऊन अष्टसात्विक भाव निर्माण झाले. पूर्वीचे वृत्तींत व मतांत एकदम पालट होऊन गुरुनिंदा केल्याबद्दल व वितंडवाद मांडल्याबद्दल खेद व लज्जा उत्पन्न झाली. स्वहित साधण्याकरितां गुरुकृपेची अत्यंत आवश्यकता आहे असा अनुभव आला. बाबाच्या विश्वव्यापकतेबद्दल, त्यांच्या अमानुष अधिकाराबद्दल व अद्वितीय श्रेष्ठत्वाबद्दल त्यांना एकदम आदर व कौतुक वाटूं लागलें. अखिल ब्रह्मांडांत सद्गुरूपेक्षां श्रेष्ठ कोणी नाहीं असे निश्चयानें कळून आलें. ही सर्व हकीकत मी त्याचेच शब्दांत खालीं देतों:—

आधीं हा लेखक खट्याळ । जैसा खट्याळ तैसा वाचाळ ।
तैसाच टवाळ आणि कुटाळ । नाहीं विटाळ ज्ञानाचा ॥ ९८ ॥

नाहीं ठावा सद्गुरु महिमा । कुबुद्धी आणि कुतर्क प्रतिमा ।
सदा निज शहाणीवेचा गरिमा । वादकर्मा प्रवृत्त ॥ ९९ ॥

काकासाहेब भक्तप्रवर । नानासाहेब चांदोरकर ।
यांसी ऋणानुबंध नसता जर । कोठून जाणार शिरडी हा ॥ १०० ॥

काकासाहेब अग्रहा पडले । शिरडी जाणें निश्चित ठरलें ।
जावयाचे दिवशींच बदललें । मन ते फिरलें अवचित ॥ १०१ ॥

याचा* एक परममित्र । तो लब्धानुग्रह गुरुपुत्र ।
असतां लोणावळ्यांस सहकलत्र । प्रसंग विचित्र पातला ॥ १०२ ॥

तयाचा एकुलता एक सुत । शरीरें सुदृढ गुणवंत ।
असतां त्या शुद्ध हवेच्या स्थानांत । ज्वराक्रांत जाहला ॥ १०४ ॥

केले सकळ उपाय मानवी । जहाले दोरे उपाय दैवी ।
गुरूस आणून सन्निध बैसवी । अखेर फसवी सुत तयातें ॥ १०५ ॥

* अण्णासाहेब दाभोळकरांचा.

कानीं पडतां ही दुर्वार्ता । अति उद्विग्नता आली चित्ता ।
हीच काय गुरूची उपयुक्तता । पुत्र एकुलता राखवेना ॥ १०८ ॥

किमर्थ जावें शिरडीप्रती । काय त्या माझ्या स्नेह्याची स्थिती ।
हाच ना लाभ गुरूचे संगतीं । गुरु काय करिती कर्मास ॥ ११० ॥

असेल जें जें ललाटीं लिहिलें । तें तेंचि जरी होणार वहिलें ।
मग ते गुरूवीण काय कीं अडलें । जाणें ठेलें शिरडीचें ॥ १११ ॥

नानासाहेब प्रांताधिकारी । करूं निघाले वसईची फेरी ।
ठाण्याहून दादरावरी । येऊनी तिळभर बैसले ॥ ११५ ॥

गाडी एक केवळ वांद्र्यापुरती । ते मग बैसती तियेंत ॥ ११७ ॥

येतां गाडी निजस्थानीं । निरोप आला मजलागुनी ।
मग मी भेट घेतां तत्क्षणीं । चालली कहाणी शिरडीची ॥ ११८ ॥

" केव्हां निघणार सांई दर्शना । किमर्थ आळस शिरडी गमना ।
दीर्घ सूत्रता कां प्रस्थाना । निश्चिती मना कां नाहीं ॥ ११९ ॥

पाहूनी नानांची आतुरता । मीही शरमलों आपुले चित्ता ।
परी मनाची झालेली चंचलता । पूर्ण प्रांजलता निवेदिली ॥ १२० ॥

त्यावरी मग नानांचा बोध । कळकळीचा प्रेमळ शुद्ध ।
परिसतां शिरडी गमनेच्छोद्बोध । अति मोदप्रद जाहला ॥ १२१ ॥

" तात्काळ निघतों " घेतलें वचन । तेव्हांच नानांनीं केलें प्रयाण ।
मग मीही मागे परतोन । ठेविलें प्रस्थान मुहूर्तीं ॥ १२२ ॥

तिकडे भाऊसाहेब दीक्षित । होतेच मार्गप्रतीक्षा करित ।
उदयीक नऊ दहाचे आंत । जहालों शिरडींत सादर ॥ १३१ ॥

इसवी सन एकुणीसशें दहा । वर्तमान हे घडलें पहा ।
एक साठ्यांचाच वाडा तेव्हां । होता रहावयास उतारूंस ॥ १३२ ॥

येतांच शिरडीस प्रथम दिवशीं । बाळासाहेब भाट्यांपाशीं ।
आरंभ झाला वादवादीसी । गुरु काशासीं व्हावा कीं ॥ १५० ॥

अंगीं दुर्धर देहाभिमान । तेणेंच वादावादीचें जनन ।
अहंभावाची ही खूण । नाहीं त्यावीण वाद जगीं ॥ १५४ ॥

पुढें मंडळी समवेत । आम्ही जातों जों मशिदींत ।
बाबा, काकासाहेबांप्रत । परिसा पुसत काय तें ॥ १६५ ॥

“ काय चाललें होतें वाड्यांत । वाद कशाचा होता भांडत ।
काय म्हणाले हे हेमाडपंत ” । मजकडे पहात बोलले ॥ १६६ ॥

वाड्यापासून मशिदीपर्यंत । मध्यंतरीं अंतर बहुत ।
बाबांस कळले कैसे हें वृत्त । आश्चर्यचकित मी मनीं ॥ १६७ ॥

असो ऐसा मी वाग्बाणहत । जाहलों निःशब्द लज्जावनत ।
पहिल्याच भेटीस की हे अनुचित । घडले अविहित मजकरवीं ॥ १६८ ॥

गळोनि जावा वादाभिमान । एतदर्थ हें अभिधान ।
जेणे आमरण रहावें भान । नित्य निरभिमान असावें ॥ १८८ ॥

कृष्ण परब्रह्माचें रूपडें । तयासही गुरु करणें पडे ।
सांदीपनीच्या गृहीं लांकडें । सोसूनि सांकडे वाहिलीं ॥ १९० ॥

तेथें माझी काय मात । वादावादी करावी किमर्थ ।
गुरूवीण ज्ञान वा परमार्थ । नाहीं, हा शास्त्रार्थ दृढ केला ॥ १९१ ॥

## श्रीसांई लीला वर्ष १, अंक २--३ अध्याय ३ रा.

सन एकुणीसशें सोळा साली । चाकरी सरकारी पुरी झाली ।
यथायोग्य पेनशन बसली । वारी आली शिरडीची ॥ ७२ ॥

आण्णांस[1] माझी मोठी काळजी । बाबांच्या समोर करिती अर्जीजी ।

१ आण्णा चिंचणीकर.

यांच्या वाढत्या संसारामाजी । कृपा करा जी यांजवर ॥ ७४ ॥

लावा कीं यांस दुजी नोकरी । ही पेनशन कांय पडेल पुरी ।
आण्णासाहेबांची चिंता निवारी । ऐसें करी कांहीं गा ॥ ७५ ॥

बाबा तंव वदती प्रत्युत्तरीं । मिळेल मेली तयासी नोकरी ।
करावी आतां माझी चाकरी । सुख संसारीं लाधेल ॥ ७६ ॥

अपार साईंच्या अपूर्व कथा । शांतिदायक भवद्वार्ता ।
श्रोतियां देतील श्रवणोल्हासता । चित्तस्थिरता निजभक्तां ॥ ३६ ॥

तेणें मज स्फुरली वासना । ऐशा सुसंग्राह्य कथा नाना ।
ओंवुनि करावें मालाग्रंथना । हीच उपासना चांगली ॥ ४२ ॥

ही वृत्ति उठाया अवसर । बाबांस विचारूं नाहीं धीर ।
आले माधवराव पायरीवर । तयांचे कानांवर घातली ॥ ६५ ॥

तेच वेळी माधवरावांनीं । नाही तेथें दुसरें कोणी ।
ऐसाच प्रसंग साधूनी । बाबांलागुनी पुसियेले ॥ ६६ ॥

बाबा हे आण्णासाहेब म्हणती । आपलें चरित्र यथामती ।
लिहावें ऐसें येते चित्तीं । आपुली अनुमती असलिया ॥ ६७ ॥

जाणोनी माझिया मनोगता । कृपा उपजली सांई समर्था ।
म्हणती लाहसील मनोरथा । पायीं म्यां माथा ठेविला ॥ ७२ ॥

दीधला मज उदीचा प्रसाद । मस्तकीं ठेविला हस्तवरद ।
सांई सकलधर्मविशारद । भवापनोदक भक्तांचा ॥ ७३ ॥

भावार्थ जाणोनी माझे मनींचा । अनुज्ञापनीं प्रवर्तली वाचा ।
"कथावार्तादि अनुभवांचा । संग्रह सांधा करावा" ॥ ७५ ॥

---

१–२ अण्णासाहेब दाभोळकर. ३ माधवराव देशपांडे. ४ मशिदीच्या पायरीवर.

दफतर ठेवा बरें, आहे । त्याला माझें पूर्ण सहावें ।
तो तर केवळ निमित्त पाहे । लिहावें माझें मींच कीं ॥ ७६ ॥

वरील त्यांच्याच लिहिण्यावरून, आण्णासाहेबांची पूर्वीची वृत्ति व मतें कशीं होतीं, काकासाहेब दीक्षित व नानासाहेब चांदोरकर यानीं त्यांना कसें शिरडीस नेले, मध्ये व्यत्यय व विक्षेप किती आले, शिरडीस गेल्यावरसुद्धां अहंकारयुक्त वितंडवाद कशाकरितां चालला होता, बाबांच्या दर्शनाबरोबर अहंकार कसा गलित झाला, वृत्ति कशी पालटली, हेमाडपंत नांव कसें मिळाले, बाबांचे चरित्रलेखनाची स्फूर्ति कशी झाली व तें लिहिण्यास बाबांची अनुज्ञा कशी मिळाली, हें सर्व चाणाक्ष वाचकाचे ध्यानात येईल.

बाबांनीं त्यांना नंतर असंख्य अनुभव दिले व त्यांची बाबावर अलोट भक्ति बसली. काहीं काळ तरी आण्णासाहेबांच्या निकट सान्निध्यांत व सहवासांत असल्यावांचून त्याची गुरुभक्ति किती निस्सीम होती याची कल्पना करणे शक्य नाहीं.

आण्णासाहेब हे फावल्या वेळांत गीता, भागवत, उपनिषदें, वगैरे संस्कृत ग्रंथ कै. तेंडुलकर काका यांच्या सहाय्यानें वाचीत. ते फारसे संस्कृत शिकलेले नव्हते. तथापि वाचनाच्या नित्य अभ्यासामुळे त्यांना साधारण संस्कृत श्लोकांचा गोळाबेरीज अर्थ बराच कळत असे. ते श्रीज्ञानेश्वरी, दासबोध, एकनाथी भागवत, रामायण, आदीकरून मराठी ग्रंथही वाचीत असत.

त्यांना जसा ग्रंथ वाचण्याचा नाद असे, तसाच त्यांना कीर्तन व पुराणश्रवणाचाही विशेष नाद असे. ते अलीकडे संतप्रेमीही बनत चालले होते, परंतु बाबांवांचून त्यांचें मन इतर संतांचे ठिकाणीं रमत नसे.

कै. नानासाहेब चांदोरकर, काकासाहेब दीक्षित व आण्णासाहेब दाभोळकर यांचीं चरित्रें लिहून त्यांच्या फोटोसह तीं साईलीलेंत प्रसिद्ध केलीं तर तीं इतर भक्तजनांस मार्गदर्शक होतील असें मला वाटते.

आण्णासाहेब इतर व्यवसायांतून रिकामे झाले न झाले कीं त्यांचे तोंडास " हरि हरि श्रीहरी " हा श्री ज्ञानेश्वर महाराजकृत हरिपाठातील १४ वे अभंगांतील शिवाचा नामोच्चार करण्याची संवयच लागली होती. या मोक्षदायी मंत्राचा उच्चार ते नेहमीं रिकाम्या वेळांत करीत. त्याना वाचा-तन चांगलेच साधलें होते. त्यांना जरी ७० वे वर्ष लागले होतें तरी त्यांचे शरीरावर " कृतांतकटकामलध्वजजरा " हीं चिन्हे दिसत नव्हतीं. बाबांना प्रसिद्धीस आणण्यास कै. नानासाहेब चांदोरकर सर्वांशीं कारणीभूत आहेत हें सर्वश्रुतच आहे. नानासाहेबाना जसजसा बाबांचा जास्त जास्त अनुभव येत चालला तसतसे ते आपल्या इष्टमित्रांना बाबांचे लीला-कथामृत पाजून व सदुपदेश करून शिर्डीकडे खेचीत.भक्त जसजसे जास्त येऊं लागले, तसतशी त्यांची स्टेशनवरून शिरडीस जाण्यायेण्याची वाहनाची सोय, शिरडीस गेल्यावर तेथें राहाण्याची व जेवण्याची सोय, व बाबांच्याही खाण्यापिण्याची, व बाबांनीं गरीबगुरिबांस देण्याकरितां ,मारवाड्याकडून उसनवार आणलेले पैसे देऊन टाकण्याची सोय नानासाहेबच करीत. या सर्व सोयी बाबा हयात असतांनाच नानासाहेबांनीं केल्या होत्या. श्री तात्यासाहेब साठे, व कै. काकासाहेब दीक्षित यांनीं शिरडीस वाडे बांधले. श्री बाळाभाऊ चांदोरकर यांनीं भाड्या-करितां तांगे ठेविले. श्रीमंत कै. बापूसाहेब बुट्टी यांनीं श्री बाबांच्या आज्ञेवरून बाबाकरितां सुंदर व भव्य मंदीर बांधिले. हीं सर्व कामे बाबा हयात अस-तांना झालीं.

बाबा समाधिस्त झाल्यापासून अहमदनगर कोर्टाची शिरडी संस्थानची योजना अमलांत येईपर्यंत नानासाहेबांनीं केलेली पूर्वीचीच व्यवस्था सुरू होती. अहमदनगर कोर्टाचे योजनेप्रमाणें व्यवस्था कै. काकासाहेब दीक्षित व आण्णासाहेब दाभोळकर यांनीं अमलांत आणली. कै. काकासाहेब दीक्षित यांच्या निधनानंतर ती व्यवस्था आण्णासाहेबांनीं आपल्या देहावसनाच्या शेवटच्या क्षणापर्यंत अमलांत आणली;

वरील विवेचनावरून असे दिसून येईल कीं, शिरडी संस्थान व्यवस्थेची नानासाहेब व काकासाहेब यांनीं घातलेली सुंदर घडी उभयतांच्या निधनामुळें विस्कळित होण्याची वेळ आली असता आपत्तीस न डगमगतां धैर्यानें संक-टास तोंड देऊन शिरडी संस्थानच्या तिन्ही शाखांच्या कामाचें जोखीम आपले शिरावर घेऊन आण्णासाहेबांनीं संस्थानची उत्तम प्रकारें कामगिरी बजावली. आतां मात्र त्यांची रिकामी झालेली जागा कशी भरून निघावयाची हा मोठाच पेच आहे.

आण्णासाहेबांच्या आकस्मित निधनामुळें त्यांच्या कुटुंबांतील मंडळीचे तर नुकसान झाले आहेच; परंतु त्यामुळे शिरडी संस्थानचे मात्र अपरिमित नुक-सान झाले आहे. आण्णासाहेबांच्या एकनिष्ठ गुरुभक्तीचे व प्रामाणिक गुरुसेवेचे योग्य फळ त्याना या लोकीं मिळण्यासारखे नसल्यामुळे बाबांनीं त्याना आपल्या खास अव्यक्त दरबारांत उच्च जागा देण्याकरितां नेले कीं काय कोण जाणे! बाबांच्या दरबारांत अशा सद्भक्तांची वाण असावयाची!

अलीकडे अलीकडे आण्णासाहेबांचा व माझा, शिरडी संस्थान कायम फंड योजना, श्री सांईलीला मासिक व कै. आण्णा चिंचणीकर यांनीं बाबांस समर्पण केलेली मिळकत यासंबंधानें काम करण्याचा निकट संबंध आला होता. या सर्वच कामात त्यांचा निरलसपणा, प्रामाणिकपणा, निष्क-पटपणा, कार्यप्रेम, उत्साहबुद्धि, कर्तव्यजागृति वगैरे गुण जे माझ्या नजरेस पडत त्यामुळे मला त्यांचेबद्दल फारच प्रेम व आदर वाटे. अशा सुहृद सद्भक्तावर निष्ठुर काळानें एकाएकीं घाला घातल्यामुळे अतिशय वाईट वाटून अंतःकरण खिन्न होते. त्यांच्या देहावसानाची दुष्ट वार्ता कानीं पडतांच मीं ताबडतोब वांद्र्यास त्यांच्या बंगल्यावर गेलों; परंतु माझ्या परम दुर्भाग्यामुळे मला त्यांचें शेवटचें दर्शनही घडले नाहीं. याबद्दल अत्यंत वाईट वाटते. असो. झाल्या गोष्टीबद्दल नुसती हळहळ करीत बसण्यापलीकडे कोण काय जास्ती करूं शकणार!

आण्णासाहेबांचें निधन ता. १५ जुलई १९२९ रोजीं दुपा सुमारें २–२॥ वाजण्याचे सुमारास त्यांच्या स्वतःचे बंगल्यांत एखादे यो भ्रष्टास साजेल अशा प्रकारे आकांक्षणीय झाले.

शेवटीं अनंतकोटी ब्रह्मांडाचे जन्ममरणाचे व्यापार ज्याच्या अ इच्छेने व अतर्क्य लीलेनें अव्याहत नित्य चालत आहेत त्या विश्वव्याप विश्वाश्रय, विश्वजनक, विश्वपालक, व विश्वसंहारक प्रभु बाबांच्या चर कमलांवर हे खेदजनक वाक्पुष्प समर्पण करून, त्यांना अनन्यभावाने शर जाऊन, त्यांना अनंत साष्टांग प्रणिपात करून, ते आण्णासाहेबाच्या आत्म्या चिरशांति देवोत अशी त्यांची नम्रतापूर्वक प्रार्थना करून आप रजा घेतों.

ठाणें
२५–७–२९

बाबांचें बाळ.

# नाममहिमा आणि न्यू सॉयकॉलॉजी अथवा आटो सजेशन्

आपल्या हिंद भूमींतले सर्व संत आजपर्यंत श्रीहरीच्या नामाचा जप, गजर, अथवा जयघोष करण्याकडे सामान्य जनतेचे खास ध्यान खेंचत आले आहेत. या कलियुगांत हरिनामासारखे दुसरे साधन नाहीं. हरीचें नाम घेण्यासाठीं एका कवडीचा खर्च करावा लागत नाहीं. पाहिजे त्या वेळीं पाहिजे त्या ठिकाणीं प्रभूची आठवण करून त्याच्या नांवाचा जप करावा. प्रभुप्राप्तीचे हे अत्यंत सहज व सुलभ साधन आहे असा नामाचा महिमा आहे.

नाममहिमा श्री सांईबाबांना अत्यंत प्रिय असे. जरी ते स्वतः पूर्ण अनुभवी आणि साक्षात्कारी दैवी पुरुष होते, तरी देवाच्या नांवाचा त्यांचा जप अहर्निष चालत असे. साधन काय करावे असें विचारतां, देवाचे नांव घ्यावे असे ते सागत असत. ज्याचें ज्याचे जे इष्ट दैवत असे, व त्या दैवताच्या नांवाचा जप त्याने आपल्या स्वतःपाशीं गुप्त रीतीने जरी चालविला असेल, तरी त्याचे ते कृत्य बाबाना माहीत असून ते त्याला त्याविषयींची जाणीव देऊन, प्रोत्साहन देत असत.

माझ्या मित्राला श्रीरामदासस्वामी अत्यंत आदर्शवत् वाटत असत. श्री आत्माराव बोवाकृत श्री रामदासस्वामींच्या चरित्राचें प्रेमपूर्वक पारायण करीत असतां, श्री रामनामाचा तेरा अक्षरीं तारक मंत्र आपल्या मनांत ग्रहण करून, त्यानें त्याचा आपल्यापाशीं जप सुरू केला. ही गोष्ट त्याला एकट्यालाच माहीत होती, आणि त्यानें तो जप आपल्यापाशीं कांहीं महिने चालविला होता. सन १९१० सालीं तो श्री सांईबाबांच्या दर्शनाला दोन वेळां गेला. सन १९११ सालीं मार्च महिन्यांत तो आपल्या मुलांलेकरासहीत दर्शनाला गेला. श्रींच्या सान्निध्यांत जातेवेळीं हा आपला मंत्र ठेवावा कीं कसे हा विचार त्याच्या मनांत येतांक्षणींच, बाबा

आपले दोन्ही हात जोडून त्याला मोठ्या प्रेमानें बोलले " यावे रामचंद्र महाराज ! " मित्राला गहिंवर आला, आणि त्याने त्या मंत्राचा जप आणखी बरेच मुदतीपर्यंत मनांत कायम ठेविला, आणि त्यापासून त्याला कायिक आणि मानसिक पुष्कळ फायदा झाला आहे. खरें विचारतां माझा स्नेही एक यःकश्चित् काबाडकष्ट करणारा साधारण मनुष्य आहे. आपल्या शास्त्रांचें त्याचे यत्किंचित्ही अध्ययन नाहीं पाश्चात्य शास्त्रांचें कांहींसे तुटपुंजें ज्ञान आहे इतकेंच. लहानपणीं कै श्री रामकृष्ण भाडारकरांच्या तोंडून प्रार्थनासमाजांत ऐकलेले वाक्य, कीं ईश्वर हृदयस्थ आहे. या वाक्यावर त्याचा पूर्ण भरंवसा. तो भरंवसा त्याच्यावर जीं जीं संसारांत भयंकर संकटे कोसळलीं, त्या त्या सर्व संकटातून पार पाडण्यास त्याला सर्व प्रकारे आधारभूत झाला. आणि जेव्हां श्री सांईबाबाचे त्याला सन १९१० मध्ये प्रथमचे दर्शन झाले, त्या क्षणापासून पुढे वेळोवेळीं, श्री सांई माउलीच्या कृपेने त्याला अप्रतिम शिक्षण आणि इतर गोष्टींचा आनंददायक लाभ झाला आहे.

असो. वरील हकीकतीवरून नाममहिम्याची काय थोरवी आहे याचा लेखकाला स्वल्प का होईना, जो अनुभव आला आहे त्याहून सहस्रपट आनंददायक अनुभव इतराना मिळावा ही त्याची श्री सांई माउलीपाशीं अत्यंत नम्र आणि विनयपूर्वक याचना आहे. हा, आणि तसेच इतर लेख लिहितांना त्याला त्याच्या स्वतःचे व मित्रमंडळाचे जे अनुभव श्री सद्गुरु माउलीच्या पायांपाशीं दिसून आले, ते येथे यथाशक्ति नमूद केल्यावांचून दुसरें गत्यंतर नाहीं. यात आत्मश्लाघेचा कांहीं प्रसंग दिसून आल्यास, वाचकांनीं त्याला त्याबद्दल क्षमा करावी. निबंध लिहिण्यासाठीं त्यानें जन्मांत कधींही लेखणी हातात धरली नाहीं. म्हणून वेडींवांकडीं वाक्यें अथवा तशाच तऱ्हेची विचारसरणी दिसून आल्यास त्याची सर्व प्रकारची जबाबदारी लेखकाच्या अज्ञानाची निदर्शक आहे असे समजून, त्याला क्षमा करावी. कांहीं गोड विचार निबा-

त्यास त्याचे श्रेय सर्वस्वी श्रीगुरु माउलीला द्यावे अशी वाचकवृंदांस नम्र विनंती आहे.

असो. नामाचा महिमा का असावा, असा सवाल आधुनिक पाश्चात्य शास्त्रांचे अध्ययन केलेले विद्वान उभा करितील; आणि त्यांचा तसा सवाल हा प्रचलित शिक्षणाचा परिणाम आहे, हें खरे आहे.

ईश्वर अगम्य आहे, निराकार आहे. त्याच्या चिच्छक्तीद्वारे त्याचें खरें स्वरूप समाधिस्थितींतच केवळ अनुभवितां येते. तो अनुभव घेतांना परमानंद होतो. देहभावनेवर आल्यावर तो आनंद कसा काय आहे याचे वर्णन करता येत नाहीं. असे जे सुख, जे समाधान, जो आनंद, आत्मसाक्षात्कारानेंच केवळ कळावयाचा, अनुभव घ्यावयाचा, त्याला नामसाधन रूप कसे होते ?

ईश्वराच्या अस्तित्वाचा विचार सर्व देशांत जेथे जेथें मनुष्यप्राण्याने आपलें वसतिस्थान केले तेथे त्यानें निसर्गाचे खेळ पाहून, आपल्या अकलेप्रमाणे केला इतर सर्व देशांपेक्षा आपल्या हिंद भूमींतल्या ऋषिमुनींनीं आपल्या अगाध ज्ञानाने, ईश्वराला त्याच्या चित्छक्तीद्वारें, प्राप्त करून घेता येतो, त्याला आत्मसाक्षात्काराने अनुभवितां येतो ही गोष्ट प्रतिपादन केली. इतकी ज्ञानरूपी मजल दुसऱ्या कोणऱ्याही देशातल्या विचारांची आणि अनुभवांची गेली नाहीं.

यज्ञयागद्वारे प्राण्यांची हिंसा ईश्वरप्राप्तीसाठीं करण्याचीं आवश्यकता नाहीं असें मत, श्री भगवान् बुद्ध देवानीं प्रतिपादन केले. त्यांनीं कर्मावर जास्त जोर देऊन, ज्याने त्याने आपआपले कर्तव्य, सत्याला अनुसरून केलें असतां, पुष्कळ आहे असे शिकविले. या कर्तव्याची जाणीव इतकीं प्रबळ झाली कीं, कास्पियन समुद्रापासून ते मळायाच्या बेटापलीकडे, हिंद निवासी लोकांचा जय जयकार झाला, चीन, जपान, सायाम या दूरवरच्या देशांत हिंदी संस्कृतीचा विजय झाला. ज्याचे जीवत परिणाम अद्यापि दिसत आहेत. शिकंदराने, हिंदुस्थानावर स्वारी केली तरी, त्याला माघार घ्यावी लागली. त्याच्या

बरोबर असलेल्या हिरोडोटस नामक इतिहासज्ञानें आपल्या पुस्तकांत नमूद केले आहे कीं, हिंदुस्थानांत " No man was found to tell a lie and no woman faithless. " " एकही मनुष्य असत्य वाणी वदणारा नव्हता, एकही स्त्री दुराचरणी नव्हती. " काय ही कर्तव्याच्या मातब्बरीची साक्ष ! त्या वेळीं हिंदी लोक लढाया करीत नव्हते असे नाहीं. कर्तव्यासाठी समरांगणात प्राण देत घेत असत.

पुढें श्री बुद्धदेवाच्या अनुयायांत मंत्रतंत्र वगैरे दुर्बलतेचे प्रकार घुसून, व बुद्धदेवांचे पुतळे बनवून, त्याची पूजाअर्चा होऊं लागली. त्यामुळें मूर्तिपूजेला जोर मिळाला. मूर्तिपूजेचे अनेक प्रकार चालू झाले या प्रकारांना वळणीवर आणण्यासाठीं श्री शंकराचार्यांचा अवतार झाला. त्यांनीं लोकसंग्रहासाठीं सूर्य पंचायतनाची पूजेंत योजना करून अद्वैत मताची जाणीव देऊन, आपणां सर्वांवर अगणित उपकार केले आहेत. त्यानंतर विशिष्ट अद्वैत व द्वैत मतांचा प्रचार होऊन, मतामतांचा गलबला विशेष जोरांत आला. मूर्तिपूजेचा प्रचार वाढला. परमेश्वराच्या आराधनेसाठीं त्याच्या सगुण रूपांना मूर्त स्वरूपें भक्तांनीं दिली, आणि त्यामुळें अनेक दैवतें व मूर्ति निर्माण झाल्या. प्रत्येकाला, माझेच दैवत श्रेष्ठ व इतर दैवते गौण असे वाटून, द्वेषभाव वाढला. जेथे तेथे केवळ शाब्दिक वादविवादाला अग्रस्थान मिळालें. श्री बुद्धदेवाच्या वेळच्या कर्तव्याची, आत्मविश्वासाची, जाणीव लुप्त होत गेली. एकीकरण नष्ट झाले. अशा वेळीं परकीयांच्या स्वाऱ्या आपल्या देशावर वायव्येकडून व समुद्र किनाऱ्यावर झाल्या.

मूर्तिपूजेचें खरें रहस्य नष्ट झाले. मूर्ति दगडाच्या अथवा धातूंच्या ही भावना वाढली. ही जर भावना वाढतीना तर मगदूर काय, कीं गिझनीचा महंमद सोमनाथाची मूर्ति फोडूं शकता ! मूर्तिपूजेची निव्वळ कवाईत झाली. आणि पोकळ कवाइतेचें पोकळ फळ जनतेला मिळाले. मूर्तिपूजेचे खरे रहस्य आपल्या देशांतल्या संतांना आणि शिवरायासारख्या महात्म्यालाच कळलें. श्री नामदेवानीं लहानपणीं श्री विठोबाच्या मूर्तिला दूध प्यावयास लावले ही गोष्ट

आजचे विद्वान कबूल करणार नाहींत, पण ते अशक्य नाहीं. नामदेवाला ती श्री विठोबाची मूर्ति दगड वाटत नव्हती. त्याच्या स्वतःच्या चिच्छक्तीचें व श्री विठोबाच्या मूर्तिंतल्या अंतर्गत चिच्छक्तीचें इतकें अप्रतिम तादात्म्य झालें कीं, त्या इतरांना दगड दिसणाऱ्या मूर्तीला दूध पिणें भाग पडलें. हीच गोष्ट श्री शिवप्रभूची. श्री शिवप्रभूला श्री भवानी दगड दिसली नाहीं. तिचे ठिकाणीं त्यांचें इतके अप्रतिम प्रेम, विश्वास, आणि श्रद्धा होती कीं, श्री भवानीरूपीं चिच्छक्तीला श्रीशिवरायांना योग्य ती सल्ला देणें भाग पडलें. अलीकडच्या काळांत मूर्तिपूजेचें खरें रहस्य जाणणारांत श्री रामकृष्ण परमहंसांना अग्रस्थान दिले पाहिजे. हीच मूर्तिपूजा खरी, नाहींपेक्षां निवळ कवाईत. आपल्या इष्ट मूर्तीवर आपले जर खरें खरें निस्सीम प्रेम आहे तर ज्याप्रमाणे आपलीं मुलेमाणसें, पति, पत्नी, माता, पिता, इत्यादि प्रिय माणसांच्या मूर्ति, मग तीं माणसे हयात असोत अथवा मृत असोत,आपण आठवण करतांक्षणींच आपल्या मनःचक्षूंपुढे दृग्गोचर होतात, त्याप्रमाणे जेव्हां आपल्या इष्ट मूर्तीचें रूप आपल्या मनःचक्षूंपुढे उभें राहातें, तेव्हाच खऱ्याखुऱ्या मूर्तिपूजेच्या ओनाम्याला प्रारंभ होऊन, पुढे स्वाभाविक आवडीने तिची मानसपूजा करतां येते, व मग पुढे मन, बुद्धि व ते रूप यांची तन्मयता होते. हा अनुभव संतांनीं घेतलेला आहे आणि श्री सांई माउलीने भक्तांना देऊन त्यांचे कल्याण केलें आहे.

मूर्तिपूजेवर लेखकाचा कटाक्ष आहे असें मुळींच नाहीं.साध्या भोळ्याभाबड्या माणसांना ध्यान करण्यासाठीं इष्ट मूर्तीची अवश्यकता आहे. पूजेमध्यें चित्त एकाग्र करण्यासाठीं प्राणायामादि साधनांची जरूरी गोंवून दिली आहे. पण त्या अत्यंत उपयुक्त साधनांचा मुळींच उपयोग होत नाहीं. त्यांची निवळ कवाईत होत असते, तेथे तद्रूपता कशी व्हावी, आणि पूजेचे फळ तन्मयता, ती त्या बापड्या मूर्तिरूपी इष्टदेवतेनें द्यावी कशी ?

---

१ डॉ. जगदीशचंद्र बोस यांच्या शोधांचा सूक्ष्म विचार करावा.

या विचारामुळे ब्राह्मसमाज, प्रार्थना समाज, आणि आर्यसमाज हीं अस्तित्वांत आलीं. या संस्थांनीं आपआपल्या परीनीं जनतेला योग्य वळण लावण्याचा उद्योग चालविला आहे. तरी निराकार प्रभूची सगुण रूपानें अथवा अग्निसाक्षित्वाने प्रार्थना करून आत्मसाक्षात्कार होण्यापर्यंत त्या समाजांतील व्यक्तींची मजल अथवा जिज्ञासा जोंपर्यंत पोहोंचली नाहीं, तोंपर्यंत संतांच्या शिकवणींचं मर्म त्यांच्या हातांत आलें नाहीं असे दिलगिरीनें म्हणावे लागते. सामाजिक बाबतीत त्यांची कामगिरी श्रेष्ठ आहे. सामान्य जनता त्यांचे अनुकरण करीत आहे, पण स्वधर्माचा जसा पाठिंबा मिळाला पाहिजे तसा जनतेत दिसून येत नाहीं असें कां, व आपले चुकते कोठे, याचा व्हावा तसा विचार होत नाहीं. जेथे तेथे अनास्था दिसून येत आहे. जनता कामकुवत झाली आहे. धैर्य नष्ट झालें आहे. अवनतीरूप उदासीनता सर्वांना ग्रासू पाहात आहे. याचें मुख्य कारण आत्मविश्वास लुप्त होणे.

जोंपर्यंत बुद्धकालापूर्वी आणि बुद्धकाळींही आत्मविश्वासाच्या शिकवणींवर जोर देण्यांत येत होता, जोंपर्यंत, आपल्या आत असलेल्या चिच्छक्तीचा विकास होण्याची शिकवणूक ऋषिमुनींच्या आश्रमातून राजाच्या मुलापासून तों रंकाच्या पोरापर्यंत सारखीच मिळत होती, तोंपर्यंत प्रत्येकाच्या हृदयात आपल्या कर्तव्याची जाणीव अबाधित राहून निधड्या छातीनें सामान्य जनता वागली, आणि त्यामुळे तिने आपली भरभराट करून घेतली. पुढे जेव्हा शुष्क वादावादीचे दिवस आले, आपल्या अंतर्गत असलेल्या अतर्क्य व अमर्याद सामर्थ्यांच्या शिकवणींची हेळसांड होऊं लागली, ईश्वराच्या सगुणरूपाचीं द्योतके मूर्ति यांच्या बाह्य स्वरूपापासून सामर्थ्याची याचना करण्याकडे जनतेची दृष्टि फिरविण्यांत आली, त्याबरोबर आत्मविश्वास दिवसेंदिवस ढासळत चालला. क्षुल्लक गोष्टींना महत्त्व आलें. घराचे वांसे मानसिक दुर्बलतारूपी वाळवीनें पोखरून पोकळ केले. त्यामुळे केवळ शारीरिक बळावर आत्मविश्वास असणाऱ्या बाहेरच्या रानवट सस्कृतीच्या झुंडीवर झुंडींच्या

सोसाट्यापुढें आपले जनतारूपी घर डळमळून कोसळत होते, ते संताच्या कृपेने आणि त्याच्या वचनरूपी जीवंत आधाराच्या टेक्यानीं फक्त जमीनदोस्त व्हावयाचे राहिले* आहे.

आतां हा आत्मविश्वास पुन्हा जागृत व्हावा कसा? एक वेळ अन्न मिळावयाची भ्रांति, देशात अठरा विश्वे दारिद्र, अशा वेळीं तुम्ही कोठले कोहं सोहं घेऊन बसलांत. प्राणायामादि साधनाना फुरसत नाहीं (मात्र ब्रिझिकादिक निरर्थक डाव खेळण्यास अवसर मिळतो!) जीवनासाठीं कोण भयंकर चढाओढ चालली आहे! परीक्षा पास होऊन एम. ए., एल्एल्. बी. तीस रुपये पगारावर राहतो, आणि हाजी हांजी करून लांगूलचालन करतो. एखादे पाश्चात्य पोर रेल्वे स्टेशनावर खाडकन त्याच्या बायकामुलापुढे त्याचा पाणउतारा करिते. ते तो निमूटपणे सहन करतो. मात्र हाताखालच्या दीनदुबळ्या नोकरांवरचा व कधीं कधीं घरांतल्या बायकापोरांचा कर्दनकाळ! काय ही आत्मवंचना! श्रीमद्भगवद्गीता मुखोद्गत आहे, व्याख्यानांवर आणि कीर्तनांवर झोड दिलेली आहे, आणि गडी पहावा तर आपल्या उपरींपुढे "यास् साआर" करीत शरीर धनुष्याकृति, असा दीनवाणा उभा! श्री काशीक्षेत्राचे प्रसिद्ध ब्रह्मीभूत श्री भास्करानद सरस्वीति याना त्याच्या एका शिष्याने असाच सवाल केला.× त्याला महाराजानीं जबाब दिला. आपले लोक श्री गीतेचे पठण करितात, पण त्याप्रमाणे आचरण ठेवीत नाहींत म्हणून आपले पतन. पाश्चात्य लोक श्री गीतेचे पठण करीत नाहींत, पण तिच्या शिकवणीचे आचरण ठेवितात, सबब त्याचा उत्कर्ष.

सन १९१७ सालची गोष्ट. दसरा आणि कोजागरी श्री सांईबाबांच्या पायांपाशीं करून माझा मित्र मुंबईला परत आला. त्याच दिवशीं त्याच्या

---

* कै. न्या. महादेव गोविंद रानडे या पुण्य पुरुषाने "लिहिलेलें Rise of the Maratha Power" हें पुस्तक जरूर वाचावें.

× स्वामी श्री भास्करानंदजी नुं जीवन वृत्तांत. तंत्री भिक्षु–अखंडानद सस्तु साहित्यवर्धक कार्यालय. कालबादेवी. मबई. (गुजराथी भाषेंत)

दुखणाईत मालकाकडून श्रींची पुन्हा भेट घेण्यासाठीं हुकूम* झाल्यावरून तो शिर्डीला बायकोसह त्याच रात्रीं पुन्हा गेला. तेथें तीनचार दिवस राहून परत येते वेळीं श्रींची परवानगी घेतांना त्याला रडूं कोसळलें. बिचाऱ्याच्या स्वप्नींही नव्हते कीं, ही आपली श्रींच्या चरणांची शेवटची भेट. कारण श्री सांई माउलेने पुढल्या वर्षांच्या दसऱ्याला आपला देह ठेवला. त्याच्या डोळ्यांतून एकसारखे पाणी वाहत आहे असे पाहून, बाबा म्हणाले: " असं काय रे येडयावाणी करतोस ? मी तिकडे तुझ्यापाशीं नाहीं का ? " मित्र म्हणाला " बुद्धीने कळते पण अनुभव नाहीं. बाबा म्हणाले जा मी तुझ्यापाशीं तिकडे आहे, तुला माहीत आहे. मग असं काय करतोस ? "

असे आश्वासन दुसरें कोण देईल बरे ? या आश्वासनाच्या आधारा-वर माझा मित्र आपला जीवनक्रम चालवीत आहे.

आतां आपण मूळ मुद्यावर येऊं. New Psycholog, न्यु साय-कॉलॉजी, अथवा autosuggestiou ऑटोसजेशनन आत्मनिवेदन, आत्म-सूचन, हे काय आहे ? पाश्चात्यानीं मानसशास्त्राच्या आधारानें मनुष्याचा जीवनक्रम कसा सुखावह करता येईल, लहानथोर दुखणाइतांना, व्याधि-ग्रस्ताना, त्यांच्या मनाला उत्साहपूर्वक आधार आणि स्फूर्ति देऊन स्वल्प सायासानें त्या दुखण्या अथवा व्याधींपासून मुक्त करून त्याचा आयुष्यक्रम सुख समाधानाने त्यांना कसा ठेवता येईल हे पाश्चात्यांचे नवे मानसशास्त्र शिकविते. याला इंग्रजी ऑटोसजेशन असें नांव देण्यात आले आहे. याचा समावेश श्रीनारदांच्या भक्तिसूत्रांत वर्णन केलेल्या आत्मनिवेदन भक्तींत करतां येतो.

मोंशियर कोए या नांवाच्या एका फ्रेंच गृहस्थानें फ्रान्समध्ये नानसी या गांवाजवळ एक संस्था स्थापन केली आहे. सन १९२१ पासून त्याचे प्रयोग प्रसिद्धीस येऊं लागले. आणि आजमितीस त्याच्याजवळ शेकडों

* हा अनुभव श्री सांई लीलेच्या १ ल्या वर्षाच्या अंकांत आला आहे.

डॉक्टर आणि इतर स्त्री–पुरुष त्याची चिकित्सा पद्धति आणि त्यावर उपाय करण्याची रीत शिकून इंग्लंड, अमेरिका, जर्मनी, रशिया वगैरे सर्व देशांत, त्याच्या उपायपद्धतीची योजना करीत आहेत. मोंशियर कोए आणि त्याचे कांहीं अनुयायी, या उपचारांबद्दल कोणाकडून एक पैचाही मोबदला घेत नाहींत.

मोंशियर कोएयांच्या प्रयोगाने संधिवाताने हातपाय जखडलेलीं, क्षयरोगाने अंगाला व्रण पडलेलीं, डॉक्टर लोकांनीं महिन्यावर महिने उपचार करून असाध्य म्हणून बरे होण्याविषयीं निराश झालेलीं, अशीं हजारों बालके व स्त्री–पुरुष बरीं केलीं आहेत ते पाहून सर्व पाश्चात्य जग आश्चर्य करीत आहे. मो कोए चे प्रयोग अत्यंत साधे आहेत, आणि ते कोणालाही स्वल्प रीतीने अनुकरण करण्यांत येण्याजोगे आहेत. मों. कोए याच्या प्रयोगाची मुख्य भिस्त दुखणाईताच्या आत्मभावनेला उत्तेजन देण्याकडे आहे. जागृत अवस्थेपेक्षा आपल्या निद्रिस्थ स्थितींत आत्मशक्तीचा विलक्षण जोर असतो हें त्याने जाणलें. जागृत अवस्थेंतल्या आत्मशक्तीपेक्षां निद्रिस्थ अवस्थेंतली आपली नैसर्गिक आत्मशक्ति अनेक पटीनें बलवान आहे हें तत्त्व त्याने अनुभवून पाहिलें. आणि त्यासाठीं जागृत अवस्थेत असतां, इच्छाशक्तीवर यत्किंचित् ताण न देता, कल्पनायुक्त भावनेवर (Imagination) भिस्त ठेवून, झोंपी जाण्याच्या, तसेंच निजून उठण्याच्या संधींचा फायदा घेऊन त्या संधींच्या वेळीं त्या भावनेवर विश्वास ठेविला असता, शरीरावर व मनावर आश्चर्यकारक परिणाम होऊन, असाध्य रोग बरे होतात इतकेंच नाहीं, तर त्या मनुष्याचा आत्मविश्वास वाढून त्याचें आत्मबळ त्याच्या पुढील वर्तनावर दिसून येतें. आत्मविश्वास वाढविण्याची ही मों. कोए यानीं अति उत्तम, बिन पैशाची युक्ति शोधून काढली आहे. तिचा जरूर सर्वांनीं उपयोग करावा. या युक्तीमध्ये परमेश्वरावर जर भरंवसा असला तर त्वरित फायदा होतो असे त्याचें मत आहे. ×

× The practice of autosuggestion by the method of Emile Coue by C. Harry brooks, published by George Allen & Unwin price 3/6

आपले योगशास्त्र तरी हेंच शिकवीत आहे. समाधि आणि निद्रा या दोन स्थितीमध्ये फारच किंचित् पण अतिशय अवघड असा फरक आहे, याला बाबा भिंत, खई, वगैरे शब्द योजीत असत. सुमारें १९१५ सालची गोष्ट. माझ्या मित्राची बायको आणि त्याचा धाकटा मुलगा मे महिन्याच्या सुटीचा फायदा घेऊन शिरडीस गेले

एके दिवशीं सहज बोलतांना बाबा म्हणाले " आये मला तुझ्या घरीं दिवसांतून तीनतीनदा यावे लागते " बाई म्हणाल्या, " होय बाबा. " तेव्हा तेथे एक बाई होत्या त्या म्हणाल्या " बाबा तुम्ही कांहीं तरी बोलतां! आम्ही तुम्हाला येथे हमेशा बसलेले पाहातों आणि तुम्ही या बाईंच्या येथे तीनतीनदां जातां हें कसें ? हे कांहीं तरी बोलतां! " बाबा म्हणाले " मी खोटे बोलत नसतों. मी महालक्ष्मी आहे. आये मी तुझ्या घरीं येतों. तूं मला जेऊं खाऊं घालतेस, खरं ना ? " माझ्या मित्राची बायको म्हणाली " होय बाबा. " तेव्हां त्या शिर्डीकर बाई बोलतात, " बाई, बाबा तुमच्याकडे खरेच येतात आणि तुम्ही त्याना जेऊं घालता ? " मुंबईकर बाई म्हणाल्या, " होय. " मित्राच्या मुलाकडे वळून बाबा म्हणाले, " कायरे मी तुझ्या घरीं येतों ना ? " तो म्हणाला " होय बाबा. " तेव्हां त्या शिर्डीकर बाईकडे वळून बाबा म्हणाले, " अग आये मी असा सरळ जातो भाऊच्या घराकडे, मध्ये भिंत आहे, तिच्यावरून उडी मारली कीं रेलगाडीचा रस्ता आहे आणि मग भाऊचं घर होय ना भाऊ ?" येथे मुलगा म्हणाला "नाहीं बाबा आधीं घर लागते मग आगगाडी. " बाबा म्हणाले, " आधीं आगगाडी मग घर. तुझें चुकते तूं विचार कर. " मुलगा बराच वेळ गोंधळांत पडला. त्याच्या घराचे पुढीलदार पश्चिमेकडे, घराची मागली बाजू पूर्वेकडे, आगगाडीचा रस्ता पूर्वेकडे, आणि पूर्वेकडे श्री शिरर्डी. काहीं वेळाने त्याची समजूत झाली कीं बाबांना जेवतांखातां, चहा पितां, पूजा आरती करता, नैवेद्य दाखवितां जेव्हा जेव्हां तो आणि त्याची आई संकल्प करून ती खाण्याची वस्तु श्री शिर्डीकडे तोंड करून श्रीसांईमाउलीला मनोभावाने आधीं अर्पण करून

नंतर ते पदार्थ त्यांचा प्रसाद म्हणून सेवन करीत त्या त्या वेळीं त्या दीन-वत्सल गुरुमाउलीला तें कळून येऊन त्याचा ते स्वीकार करीत असत. वात्सल्यप्रेमानें कळवळा येऊन, या साध्याभोळ्या भक्ताचा भाव जाणून, आपलें त्यांच्या विषयीचें प्रेम बाबांनीं वरील संवादानें व्यक्त केले.

या वरील संवादाप्रमाणें इतर तशाच प्रकारच्या अनुभवांविषयीं श्री सांईमाउलीच्या स्फूर्तीनुरूप पुढें एखादे प्रसंगीं विवेचन करण्यांत येईल.

श्रीसांईबाबा या सहजसमाधिस्थितीच्या स्पष्टीकरणासाठीं, " खईवरून भिंतीवरून उडी मारावी लागते " असे शब्द वेळोवेळीं वापरीत असत.

समाधि आणि निद्रा या दोन स्थितींत जाण्याचा मार्ग स्थूल मानानें बोलावयाचा म्हणजे एकच. साधारण मनुष्य चित्त एकाग्र होतां क्षणींच झोंपी जातो; योगी चित्त एकाग्र होतां क्षणींच झोंप चुकवून समाधि स्थितींत जातो. समाधीमध्यें देहाचा विसर असतो, पण चिच्छक्तीची पूर्ण जाणीव असते. निद्रेंत देहाचा विसर असतो, चिच्छक्तीचे चलन असतेंच, पण जाणीव नसते.

योगशास्त्रांनीं सांगितलेली ही स्थिति आम्ही ही पुस्तकी व बिकट गोष्ट म्हणून अनुभवांत आणण्याची खटपट करीत नाहीं. आणि तेच पाश्चात्य लोक योगशास्त्राचें कांहींही ज्ञान नसतां, या आपल्या प्रत्येकाच्या अंतर्गत असलेल्या चिच्छक्तीचा साधारण व्यवहारांत कसा उपयोग करून घेतात याचें प्रो. कोए यांचा प्रयोग हें एक उत्तम उदाहरण आहे. आम्ही गतवैभवाच्या पोकळ बडबडी करीत, आपल्या स्वतःच्या घरांत असलेल्या या अफाट सामर्थ्यरूप द्रव्याविषयीं आंधळ्या भिकाऱ्याप्रमाणें वागत आहोंत. आणि ते लोक अशा प्रकारचें ज्ञान संपादन करून, तें व्यवहारांत उपयोगांत आणून, जनतेला त्याचा फायदा देऊन, जनतेचें कोट्यकल्याण करण्यासाठीं निरपेक्ष बुद्धीनें कशी धडपड करीत आहेत याचा प्रत्येकानें सूक्ष्म विचार करावा. विजयश्रीनें त्यांच्या गळ्यांत माळ कां घालूं नये! त्यांचा उत्कर्ष कां होऊं नये!

मों. कोए म्हणतो आपण भावना उत्पन्न करावी कीं, " Day by Day in every way, I am getting better and better " म्हणजे "दिवसेदिवस सर्व प्रकारे माझी स्थिति सुधारत आहे." इच्छाशक्तीवर मुळींच भार द्यावयाचा नाहीं, हा विचार मनांत विश्वासपूर्वक आणावयाचा इतकेच. त्यांत ज्याचा देवावर अथवा सद्गुरूवर भरंवसा असेल त्याने " दिवसेदिवस " या शब्दांपुढे " देवाच्या " अथवा " सद्गुरूच्या कृपेनें " हे शब्द उच्चारावे जसे " दिवसेदिवस देवाच्या ( अथवा सद्गुरूच्या ) कृपेने सर्व प्रकारें माझी स्थिति सुधारत आहे. " मोठयानें बोलण्याचें कारण नाहीं. ही भावना मनात विश्वासपूर्वक ठेवावयाची, आणि ती जागृत अवस्थेपेक्षां, झोंपी जाण्यापूर्वी अथवा झोपेतून उठतेवेळीं जरूर मनांत आणल्यास विशेष परिणामकारक होते. या भावनेनें शरीरप्रकृति आपोआप सुधारते. शरीरांतल्या व्याधी दूर होतात. स्वाभाविक रीताने नवा जोम उत्पन्न होतो. त्यामुळे आत्मविश्वास दिवसेंदिवस वृद्धिंगत होऊन हातीं धरलेलीं कार्ये सुरळीत पार पडण्यास तशी बुद्धिद्वारें सूचना होते. आणि त्यामुळे तीं पार पडून त्या मनुष्याला आर्थिक फायदा होतो.

योगशास्त्राच्या आधारानें सांगावयाचें म्हणजे आपल्या अंतर्यामीन् चिच्छक्तीपासून जो अहंकार उत्पन्न झालेला आहे, ज्या अहंकारापासून बुद्धि, ज्या बुद्धीपासून मन वगैरे, त्या अहंकाराला बुद्धीद्वारे सात्विक सूचना देण्यात येतात. हा अहंकार सात्विक स्फूर्तियुक्त झाल्यामुळे, शरीराच्या सर्व क्रिया निकोप शरीरद्वारे आत्मविश्वास फक्त, धडाडीच्या, व बिनचूक होतात. मग तो देहधारिन् हातीं जें काम धरितो तें सफल, वैभवयुक्त, आणि इतरांना आदर्शव् असें होते. यामुळे श्रीलक्ष्मीला तो अनायासे आपल्या घरीं पाणी भरावयास लावतो.

हें पाश्चात्य देशांतले लोक योगशास्त्राचें अध्ययन न करितां शिकले. स्वधर्माला खोटें स्वरूप देणाऱ्या स्वार्थपरायण धर्मगुरूंच्या हीन स्थितीप्रत नेणाऱ्या संस्था त्यांनीं झुगारून दिल्या. त्यामुळें त्यांचा आत्मविश्वास वाढला.

भयंकर तुफाने व वावटळींतून हजारों कोसांवरून येऊन स्वतःचे प्राण मुठींत घेऊन, परकीयांच्या मानसिक दुर्बलतेचा लाभ घेऊन, त्यांच्यावर त्यांनीं आपली सत्ता गाजविली. " देवो दुर्बल घातकः " या न्यायाप्रमाणे आत्मविश्वासाला वंचलेले जन नाश पावले. पाश्चात्यांनीं सर्व जगभर धुमाकूळ केली हें कशामुळें, तर आत्मविश्वासाच्या जोरावर.

आपली सध्यांची स्थिति पहा. " आम्ही दीनदुबळे आहोंत " ही रात्रंदिवस मानसिक घोषणा. "सुऱ्या कात्री चाकू हीं मुलांचीं खेळणीं नव्हत" हा तीन पिढ्यापासूनची शिकवणूक. मूल चालू लागले कीं, " पडशील, पडशील " हे त्याला उत्तेजन ! आपल्या मनाप्रमाणें त्याने वागावें म्हणून " बागूल आला, " " उंदीर चावेल, " पाल चावेल, " " शिपायी घेऊन जाईल " अशी त्याला भीति घालणें, खेळूं लागले म्हणजे " कपडे मळवूं नको " असें त्याला बजावणें. पुढें शाळेत गेल्यावर मास्तराचा धाक. बाळपणापासून अशा प्रकारच्या विचारांची आपण आपल्या अहंकाराला दुबळेपणाची तालीम देत आहोंत, तर पुढें शरीर रोगी, बुद्धि भीतियुक्त, मुद्रा बावरी, आणि मन कमकुवत झाल्यास, त्याचा दोष आपल्याकडे नाहीं का !

तेच पाश्चात्यांचे व जपान वगैरे पुढे सरसावलेल्या लोकांचे धोरण पाहा. लहानपणीं मूल रांगावयास लागल्याबरोबर त्याच्या पुढें अक्राळ विक्राळ व रानटी क्रूर श्वापदांच्या आकृतीची बाहुलीं त्याला खळावयास देतात, पुढे त्याला लिहितां वाचतां येण्यापूर्वीं चित्रयुक्त पुस्तकें, व कृत्रिम फळें फुलें त्याच्या पुढे ठेवन त्याची जिज्ञासा वाढवितात, शाळेत गेल्यावर उत्साहपूर्वक खेळांकडे त्याचे मन रमवितात. आणखी मोठे होऊन लिहिता वाचता येऊं लागल्याबरोबर हेनरी अथवा जूलस व्हर्नसारख्या ग्रंथकर्त्यांचीं पुस्तकें त्याला वाचावयास देतात. ज्यामुळें मीच एक कर्तबगारी पुरुष होईन आणि सगळी दुनिया पालथी घालीन ही त्याच्यांत स्वभावसिद्ध ईर्षा उत्पन्न झालीच पाहिजे, आणि त्याचा आत्मविश्वास सदोदित जागृत राहिलाच पाहिजे.

यासाठीं मो. कोएच्या शिकवणीकडे, या आत्मनिवेदन भक्तीकडे जरूर लक्ष वळविले पाहिजे. कवडीचाही खर्च होत नाहीं, उदास व्हावयाचे कारण राहात नाहीं. शिवाय याच्या अभ्यासालाही योग्य ती संधी मिळतेच.

आतां आपण नाममहिम्याचा विचार करूं या. आपल्या जनतेचा विचार आपल्या अतर्गत असलेल्या अफाट सामर्थ्याचा विकास करणाऱ्या उपनिषदांच्या उदात्त शिकवणीपासून च्युत होऊन, पुढें जेव्हां सर्व सामर्थ्यवान् प्रभूच्या सगुणरूपाची मूर्तीच्या बाह्यस्वरूपापासून तें सामर्थ्य मिळविण्याच्या तजविजींत फिरविण्यांत आला, तेव्हां जनतेचा ऱ्हास होईल हें श्री वाल्मिकी, श्री व्यास, श्री वसिष्ठ वगैरे साक्षात्कारी पुरुषांनीं आपल्या अंतर्ज्ञानाने जाणून श्रीमन्महाभारत, श्रीभागवत, श्रीनारायण, वगैरे अतुलनीय ग्रंथ त्यानीं निर्माण केले. देवादिक अलौकिक स्त्री--पुरुषाचीं कथानकें त्यांत गुंफून, जनतेला भक्तिरूपि स्वल्प साधनाची व स्फूर्तिदायक गति दिली. या गतीच्या आधाराने अनेक संतांनीं आत्मसाक्षात्कार प्राप्त करून, स्वानुभवयुक्त असे अप्रतिम ग्रंथ व गीतें रचिलीं कीं ज्यांच्या जिवंत वचनांच्या आधारामुळे आम्ही हिंदु म्हणविणारे आज हयात आहोंत.

या सर्व संतांनीं नामाचे महात्म गायिले आहे तें कां ? तर नामस्मरणाने, परमेश्वराचे गुणानुवाद गायिल्याने, मनांत सात्विक भावना उत्पन्न हाऊन त्यामुळें बुद्धि सात्विक होते. सात्विक बुद्धीमुळे आपल्या अहंकाराला सात्विक प्रोत्साहन होतें. आणि हें झाल्यामुळें जरी या देहांत त्या मनुष्याला आत्मसाक्षात्कार नच झाला, तरी त्याचा योगक्षेम निर्विघ्नपणें पार पडण्यास त्याच्या अंतर्गत असलेल्या चिच्छक्तीस अथवा अंतर्यामिन् प्रभूस गरज पडते.

नामाचा महिमा आपल्या सर्व साधुसंतांनीं इतक्या उत्तम रीतीनें, भावनेनें, व अनुभवयुक्त श्रद्धेनें प्रतिपादन केला आहे कीं, त्याच्या उपयुक्ततेबद्दल लेखकासारख्या अननुभवी मनुष्यानें लिहिणें हें जसें टिटवीनें समुद्र रिकामा

करण्याचा प्रयत्न करणें यासारखें आहे. प्रभूचें, इष्टदेवतेचें नाम घेण्याचा मुख्य उद्देश हा कीं, त्यामुळे त्याच्या ठिकाणीं अचल प्रेम उत्पन्न होऊन आत्मनिवेदनरूपी भक्तीनें प्रभूच्या चरणापाशीं तल्लीन होऊन त्याच्याशीं तन्मय व्हावें. हाच मुख्य हेतु पूर्णपणें ध्यानांत घेऊन, दूरवर नजर ठेवून, श्री रामदास स्वामींनीं खेडयापाडयांतून श्री मारुति मूर्तींच्या स्थापना केल्या. श्री मारुतिरायाच्या उपासनेनें, त्याच्यापासून शारीरिक बळ वाढवून त्याच्या श्रीरामप्रभूच्या सेवेकडे पूर्ण विवेचनरूपी लक्ष देऊन, जनताजनार्दनरूपी श्रीरामप्रभूची सेवा प्रत्येकाच्या हातून व्हावी. याच मुख्य व स्तुत्य उद्देशामुळें, खेडयापाडयांतून आखाडे व तालीमखानें उत्पन्न झाले. जोरकस व जोमदार शरीरे निर्माण झालीं. ब्राह्मण व ब्राह्मणेतर सर्व हिंदु प्रजाजनांनीं एकजुटीनें वागून दिग्विजय मिळविला, आणि आपलें हिंदुत्व राखलें. श्री समर्थांचे आपल्यावर अपरिमित उपकार आहेत.

प्रभूचें नामस्मरण हें आत्मविश्वास वाढविण्याचें अति उत्तम व बिन पैशाचें साधन आहे. नामस्मरण करतांना जर त्याला श्वासोच्छ्वासाची जोड देण्यांत आली, आणि तसें करणें कांहीं कठीण नाहीं, अभ्यासानें सहजसाध्य आहे, तर त्यापासून आपल्या अहंकारावर, बुद्धीवर, मनावर, व शरीरावर उत्तम परिणाम होतात. मृत्यूची भीति तर प्रथमतःच नाहींशी होते.

नामस्मरणानें काय होतें असे आधुनिक विद्वान् विचारतात, त्यांना इतकेंच नम्रतेनें सुचवावयाचें आहे कीं, आपण मों. कोएचा प्रयोग करून पाहावा. त्यामुळें काय फायदा आहे हें प्रत्यक्ष अनुभव घेऊन पाहावें, याला एक पैचाही खर्च होत नाहीं. ही मों. कोएची शिकवणी नवी नाहीं. नामस्मरणामध्यें, आत्मनिवेदन भक्तीमध्यें या मों. कोएच्या प्रयोगाचा समावेश संतांनीं पूर्वीच केलेला आहे, परंतु पाश्चात्य शास्त्रांच्या आधारानें आपल्या मनाची समजूत करून घ्यावयाची आहे, म्हणूनच मों. कोएच्या प्रयोगाची येथे उपयुक्तता दर्शविण्यांत येत आहे.

सामान्य जनतेचा आत्मविश्वास जागृत करण्याकडे संतांचा रोख आहे, हें त्यांच्या जीवंत वचनांकडे दृष्टि देतां तात्काळ कळून येतें. आत्मविश्वासानें आत्मबळ जरूर वाढतें. आत्मबळाच्या जोरावर सर्व कांहीं कार्यें जनतेच्या हातून पार पडतात, हे पुनः पुनः सुचविण्यात येत आहे.

सर्व श्री सांईभक्तांनीं खास ध्यानांत ठेवावयाचें कीं, आपल्या सर्वांच्या तसेंच इतरांच्या हृदयांत श्रीसांईबाबांची वस्ती, या लेखकाच्या मित्राला सुचविल्याप्रमाणें, सारख्या पूर्णतेने, सारख्या प्रेमानें आहेच आहे. याची स्मृति हृदयांत निरंतर ठेवली असतां सर्वांची उन्नति सर्व प्रकारें झालीच पाहिजे.

ज्यांना श्रीसाईनाथांचे प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष दर्शन घडलें नसेल, त्यांनीं जो दिसेल त्या साधूचे पाय धरण्याचें कांहीं कारण नाहीं. आपल्या अंतर्यामिन् इष्ट मूर्तीच्या सगुणरूपाचें नामस्मरण प्रीतिपूर्वक केलें असतां तो दीनदयाळू प्रभू योग्य तो मार्ग दाखवितो यांत शंका नाहीं.

ज्यांना निराकार प्रभूची सगुणरूपानें भक्ति करावयाची आहे त्यांनीं तसेंच इतरांनींही, प्रभूच्या तेजोमयरूपाने आपल्या भृकुटीमध्यें ध्यान करावे. याविषयीं सन १८८०–१ सालीं कै. रावबहादूर शंकर पांडुरंग पंडितांनीं प्रार्थनासमाजांत उपासना करीत असता अनेक वेळां विवेचन केल्याचे लेखकास पक्कें स्मरतें. कै. पंडित यांचा वेदांचा व उपनिषदांचा व्यासंग दांडगा होता. हे समाजाच्या धुरिणांपैकीं एक अत्यंत साधे, निगर्वी, पण तेजस्वी आणि ओजस्वी पुरुष होते. ते लवकरच कालवश झाले हे आपणां सर्वांचें मोठें दुर्दैव होय.

हें तेज बिंदुस्वरूप, स्वल्प अभ्यासाने दिसूं लागते. हा अनुभव ज्यानें त्यानें आपल्या स्वभावाप्रमाणे घेऊन पाहावा; इच्छेवर भार देण्याचे मुळींच कारण नाहीं. ही फक्त अंतर्यामिन् प्रभूवर असलेल्या आपल्या प्रेमाची गोष्ट आहे. प्रेमानें प्रभु साध्य आहे, दूर नाहीं असे सर्व साधुसंत सांगत आले आहेत. श्रीसांईबाबांचीही शिकवण तशीच आहे.

या उपरांत प्रभु नाहीं, असेहीं कांहीं आधुनिक विद्वान् म्हणतील, तर त्यांना लेखकाची हात जोडून नम्र विनंती आहे कीं, आपण मो. कोएचा प्रयोग स्वतःवर करून पाहावा आणि खात्री करून घ्यावी. त्यामुळें आपली, तसेंच आपल्या समागमांत असलेल्या बाळगोपाळादिकांची शरीरप्रकृति सुधारून आत्मविश्वास वाढतो कीं नाहीं. इतकेंही केल्यास पुष्कळ आहे.

एकमेकांची उणीं काढून वितंडवाद करण्यांत अर्थ नाहीं, माझें तेंच खरें, इतरांचें खोटें असा धर्मसंबंधाच्या बाबतींत जो वृथा अभिमान बाळगतो, त्याला कांहींच कळलेले नसते. या अनुभवशून्य व शुष्क वादावादीमुळे आपल्या जनतेचे अपरिमित नुकसान झाले आहे.

सारांश, आत्मविश्वासाची आपणां सर्वांना तसेंच सामान्य जनतेला सध्यांच्या काळीं आणि हमेशाही अत्यंत जरूरी आहे. दुबळेपणाच्या वृत्ती-पासून परावर्तन होऊन-त्यांचा त्याग करून--आपलें स्वतःचें तसेंच जनतेचें आत्मबळ वाढविण्याकडे प्रत्येकानें सदोदित झटले पाहिजे अशी नम्र विनंती करून हा लेख आटोपता घेतों.

श्री सांई माउलीनें प्रेमानें संबोधिलेला

“ म्हातारा ”

# विनंती.

रा. सा. बाळासाहेब देव कळवितात की, शोधार्अंती कै. नानासाहेब चांदोरकर यांचे घरी दीडशेवर श्री दासगणू महाराजाच्या श्री भक्तलीलामृत पोथीच्या प्रती अद्यापि शिल्लक आहेत. म्हणून त्यांचा खप होईपर्यंत सदरहू गोड पोथीचें श्री सांईलीलेंत छापून प्रसिद्ध करण्याचें तूर्त तहकूब केले आहे. तरी ग्राहकानी सदरील पोथी श्री. वासुदेव नारायण चांदोरकर, दप्तरदारांचा वाडा, कल्याण यांचेकडून मागवून घेण्याची कृपा करावी. किंमत एक रुपया. टपाल हशील जादा.

श्री संत लीलामृत पोथीच्या प्रती त्यांच्याजवळ शिल्लक नाहीत.

**रा. आ. तर्खड**
संपादक
**श्री सांईलीला.**

# श्री सांईलीलेच्या ४-५ अंकाविषयीं श्री दासगणूंचा अभिप्राय.

" दासगणूचा अनेक आशीर्वाद. श्री सांईलीला मासिक पुस्तक पोचले. आपण प्रथमचा निबंध लिहून अर्वाचीन सुशिक्षित म्हणविणाराचे डोळे चांगलेच उघडले आहेत. अशा प्रकारचे निबंध श्री साईलीला मासिकांत वरचेवर येत गेल्यास पुस्तक सर्वांग-सुंदर होऊन लोकादरास व लोकसेवेस निःसंशय पात्र होईल. तसेंच कै. दादोबा पांडुरंग मराठी भाषेचे पाणिनी यानी आपल्या चिकित्सक बुद्धीने यशोदा पांडुरंगी नांवाची सुबोध व सरस टीका कविकुलगुरु आर्याचार्य श्री मोरोपत यांच्या केकावलि नांवाच्या जगप्रसिद्ध सर्वोत्तम काव्यावर केली, तिचा आपण सांईलीलेमार्फत जीर्णोद्धार करीत आहांत हें आपणास नि.संशय भूषणावह आहे. मला वाटतें श्री सांईलीलेचा एक-चतुर्थांश भाग श्री यशोदा पांडुरंगीकरिता राखून ठेविल्यास महाराष्ट्र वाचकांवर आपले उपकार होणार आहेत. कारण अलीकडे ही टीका अगदी दुर्मिळ झाली आहे. मी यशोदा पांडुरंगी नांवाची टीका वाचली नव्हती, नुसतें तिचें नांव ऐकत होतों; बाबासाहेब, फार काय सांगावे, ही टीका वाचीत असताना माझे डोळे कित्येक वेळ भरून आले व टीका-काराच्या उच्च दर्जाच्या विवेचनशक्तीचें कौतुक वाटलें.

असो. टीका आपल्या हातानें श्री सांईलीला मासिकांत पूर्ण येवो अशी त्या जगन्नियंत्याची व श्री सांईबाबांची प्रार्थना करून रजा घेतो. लोभ असावा हे आशीर्वाद

**दासगणू.**

त्यां कोणते पावनकृत्य केलें, या आशंकेचें निवारण करित होत्साते कवि म्हणतात,— **राधारते तुवांचि बहु अघाचळांहि तारिले,**—राधारते,—राधा-हरिवंशांत वर्णिलेली प्रसिद्ध कृष्णासक्तमना गोपिका तिच्या ठायीं-रत-रममाण-सप्रेमांतःकरण जो तूं कृष्ण त्या,- तुवांचि-त्वांच (एथें 'चि' या अव्ययानें इतरांची व्यावृत्ति जाणावी, म्हणजे पुराणांत पापी जनांचा उद्धार करणारे विष्णु शिव वर्णिले आहेत ते तूच असा एथें ध्वनितार्थ उत्पन्न होतो.) बहु असे-अघाचळ,—अघ-पाप, त्याचे-अचळ-पर्वत-म्हणजे पापाचे पर्वत-पर्वततुल्य पापराशी-अर्थात् मोठे प्रचंड पापी, असतां-हि तारिले-उद्धरिले-पावन केले; एथे रूपक अलंकार जाणावा. पर्वतासारिख्या पापांच्या ज्यांच्या राशी असे महत्पापी असतांहि तारिले, मग क्षुद्र पापी तारिले हे काय सांगावे, असा 'हि' शब्दानें एथें ध्वनितार्थ होतो ते महान् पापी कोण कोण म्हणून पुसाल तर ऐका-**अजामिळ, अघासुर, व्रजवधू, बकी, पिंगळा, अशां गति दिली,**—अजामिळ अघासुर-पुराणप्रसिद्ध पापी, व्रजवधू-व्रजसंबंधीं वधू-नारी-अर्थात् पतिसेवास्वार्भकपालनादि स्वधर्मोचित संसारकृत्यें टाकून यथेच्छ विहार करणाऱ्या म्हणून पापी अशा गोपांगना, बकी-पूतना पिंगळा-पुराणप्रसिद्ध वेश्या, **अशां गति दिली,**—अशां-पूर्वोक्त जे असे अघाचळ त्यांना गति-सलोकतारूप अथवा सरूपतारूप जी सद्गति म्हणजे मुक्ति ती-दिली. असे महान् पापाचे पर्वत असतांहि भगवंतानें तारिले, असा विस्मय कवि आपल्या

---

तनीयासपांसुतवचरणपंकेरुहभवं ।
विरिंचि.सचिन्वन्विरचयतिलोकानविकलं ॥
वहत्येनंशौरि'कथमपिसहस्रेणशिरसा ।
हर.सक्षुभ्यैनंभजतिभसितोद्धूलनविधिं ॥ २ ॥

भागवतांतही भगवच्चरणरजाचा महिमा वर्णिला आहे;—

यत्पादपांसुर्बहुजन्मकृच्छ्तो ।
धृतात्मभिर्योगिभिरप्यगम्यः ॥

स्कं. १०, पू. अ. १२, श्लो. १२.

१ बकी हें पूतनेचें नांव भागवतांत प्रसिद्ध आहे.—
अहोबकीयंस्तनकालकूटं जिघांसयापाययदप्यसाध्वी ।
लेभेगतिंधात्र्युचितांशरण्यं कंवादयालुंशरणंव्रजेम ॥
भाग., स्कं. ३, अ. २, श्लोक २३.

मनांत करित होत्साते पुनः ईश्वरसामर्थ्यावर दृष्टि देऊन पुढील दृष्टांतवाक्यें करून त्या विस्मयाचें दूरीकरणक रितात.–विंगळा भेटतां तृण न उरे,–विंगळा भेटतां–अग्नीच्या इंगळाला भेटलें असतां–म्हणजे प्रज्वलित अग्नीशीं गांठ पडली असतां, तृण–गवत, न उरे–उरत नाही. अथवा एथें 'उरे' या ठिकाणीं काक्वर्थ करून 'न' हें त्याचें उत्तर मानिलें असतांहि गोड, म्हणजे विंगळाला तृण भेटलें असतां तें तृण उरे काय ? तर 'न', अर्थात उरत नाहीं, असा पदान्वय करून अर्थ घ्यावा. एथें अजामिळादिकांचें उद्धरण विशेष अर्थानें सांगून अग्निसान्निध्यानें तृणनाश होतो, अशा सामान्य अर्थाने त्याचें समर्थन केले आहे, म्हणून हा अर्थांतरन्यास अलंकार होय.

या केकेत **अचाचळ**, **अजामिळ**, **पिंगळा** हे शब्द शुद्ध व्याकरणरीत्या पाहिले असतां लकारान्त असावे, परतु पुढील **विंगळ** शब्द शुद्ध महाराष्ट्र ळकारान्त असल्यानें त्याशीं वर्णैक्य याच शब्दांचे होते, म्हणून शब्दालंकारदृष्टया हाच ळकारान्त शब्दाचा पाठ प्रशस्त दिसतो.याच दृष्टीने **सकल** येथे **सकळ** असावे खरे, परंतु तो शब्द समासांत आहे म्हणून त्यांत लकार विशेष ग्राह्य.

तुझाबहुतशोधिलेअघनिधीपदाचारजें ।
नतेंअनृतवर्णितीबुधजनींसदाचारजें ॥
असेंसततऐकते*सततबोलतेमीचते ।
प्रमाणनम्हणोंजरींउचितमाझियानीचते ॥ ३ ॥

त्याच पदरजाचा महिमा पुनः विशेषेकरून वर्ण् इच्छित असतां कवि आणखी म्हणतात;—

**पदान्वयः**—तुझा पदाचा रजे बहुत अघनिधि शोधिले, बुधजनीं सदाचार जें वर्णिती तें अनृत न, असे सतत ऐकते सतत बोलते ते मीच जरी प्रमाण न म्हणों, माझिया नीचते उचित

तुझ्या पदाच्या रजानें अजामिलादि महान् पापी तारिले असे जे म्यां मागच्या केकेत म्हटले, ते केवळ माझेंच म्हणणे नाही, तर त्यास पुरातन सद्ग्रंथाचें प्रमाणहि आहे, असे दर्शवित होत्साते कवि त्याच पदरजाचे विवरण करितात **तुझा पदाचा**[1] **रजें बहुत अघनिधि शोधिले,**—तुझ्या पदाच्या रजें—रजाने बहुत—पुष्कळ—असंख्य असे—अघनिधि—पापाच्या खाणी—अर्थात् अजामिलादि महान् पापी शोधिले—शुद्ध केले[2]—पावन केले—अर्थात् उद्धरिले; असे—**बुधजनीं सदाचार जें वर्णिती तें अनृत न,**—बुधजनी—पंडित जनांत—ज्ञानवान लोकांमध्ये जे—सदाचार,—सत्—चांगला आहे—आचार—आचरण, ज्यांचे असे—सदाचरण—संपन्न—अर्थात् नुसते वाचालपंडित नव्हत तर त्यामध्येंहि भक्तिरूप सदाचरणानें जे सपन्न ते, **जें वर्णिती**—जें वर्णितात—अर्थात् तुझ्या पदरजाचे माहात्म्य, **तें**

---

* **असे शत न एक ते**—असेहि पाठांतर आढळतें.

१ म्यां जो आपल्या महाराष्ट्र व्याकरणांत नियम सांगितला आहे (पहा० आवृत्ति ३ री, नियम २६८, पृष्ठ १०६ ) की, **च ज झ स** एतद्वर्णांत जे शब्द त्यांस विभक्तिप्रकारानुरूप यकाराचा योग केला असता, या वर्णांचा हा आगतुक दततालव्योच्चार जाऊन मूळचा जो शुद्ध तालव्योच्चार तोच परावर्तन पावतो, त्यास ही केका चांगलें साहाय्य करितये. ईत पहिल्या चरणांतली शेवटली पदे **पदाचारजे,** आणि दुसऱ्या चरणातली शेवटची पदें **सदाचारजें,** यांची प्रासनियमाप्रमाणे वर्णैकता आवश्यक असल्यानें **पदाचा** येथें **पदाच्या** असें षष्ठ्यत सामान्यरूप केले असतां वर्णव्यत्ययरूप दोष येतो, म्हणोन येथे **पदाचा** याचे **पदाच्या** असेच षष्ठ्यंत सामान्यरूप लिहिले पाहिजे.

२ एथें शोधणे म्हणजे शुद्ध करणे. मूल संस्कृत **शुध—शोचे,** या धातूच्या अर्थाप्रमाणे एथें या क्रियापदाचा अर्थ जाणावा.

अनृत न,-तें अनृत-खोटें न-नाहीं. कदाचित् आपण पुसाल कीं, असें कोणी म्हटलें, कोणी ऐकिले, तर- असे[1] सतत ऐकते सतत बोलते ते मीच जरीं प्रमाण न म्हणों,-असे-जे या प्रकारचे सतत्-निरंतर ऐकते-ऐकणारे बोलते-बोलणारे (ऐकता, बोलता, या ताप्रत्ययान्त धातुसाधित नामाचें अनेकवचन)-जे कोणी सूतशौनकादि पुराणप्रसिद्ध ज्ञाते ते मीच जरी प्रमाण न म्हणों-मीच ते जर प्रमाण-प्रमाणीभूते, न म्हणों-न म्हणावें तर ही जी माझी धिटाई ती-माझिया नीचते उचित,-माझिया-माझ्या, नीचते-नीचतसे-अर्थात् लघुत्वास, उचित-योग्य, होय.

---

१ तिसऱ्या चरणांत जो प्रथम शब्द **असे** म्हणून लिहिला आहे,त्या ठिकाणी **असें** म्हणण्याचाहि बहुत पाठ असेल असे मला वाटते, परतु एथे **'असे'** हे **बोलते** आणि **ऐकते** या धातुसाधित नामांचे विशेषण करावे हा पक्ष मला चागला दिसतो. **असें** हें क्रियाविशेषण केले असता या धातुसाधित नामांचा जो क्रियांश त्याचे विशेषण मानावे लागेल, हा कांही मोठा दोष आहे असे नाही, कारण, हे जरी त्या क्रियांशाचें विशेषण न मानले, तथापि पुढले **सतत** हे शुद्ध क्रियाविशेषण असल्याने त्याच क्रियाशांचे विशेषण मानिल्याशिवाय गत्यतर नाही. परतु **असे** हे प्रकारार्थक विशेषण असल्याने **बोलते**, **ऐकते**, या साऱ्या धातुसाधित नामाचे विशेषण मानावे हे व्याकरणदृष्ट्या त्यापेक्षा प्रशस्ततर दिसते. आणखी,-'असे दाता आज कोण ऐकतो,' ' तसे कर्ता कोणी लिहीत नाही,' -अशी ताप्रत्ययान्त धातुसाधित नामाच्या मागे क्रियाविशेषणाची योजना भाषारूढीस अनुकूल नसता,-'असा दाता आज कोण ऐकतो,' 'तसा कर्ता लिहीत नाही,' अशा प्रकारार्थक विशेषणाचीच योजना भाषारूढीस अनुकूल दिसते. या प्रमाणावरून एथे **असे** हा पाठ मला प्रशस्त दिसतो अथवा, **असें** हे क्रियाविशेषण न मानितां दर्शकसर्वनाम जरी मानिले, तरी **ऐकते**, **बोलते**, यांतील क्रियाशांचेच कर्म त्यास मानिले पाहिजे; तेव्हा सर्वनाम मानिल्यानेहि पूर्ववत् दोष येतो, म्हणून **असे** हे **ऐकते**, **बोलते**, यांचें प्रकारार्थक विशेषण करावे हाच पक्ष उत्तम दिसतो.

तसाचिउरलोंकसापतितमीनसेंकायकीं ॥
कृपाचिसरलीअसेंहिनघडेजगन्नायकीं ॥
नसेनदिसलोंकसानयनसर्वसाक्षीरवी ॥
विषादधरिलाम्हणोंनसुरभीविषक्षीरवी ॥ ४ ॥

मागल्या दोन केकांत भगवंतानें इतर महान् पापी जनाचे उद्धरण केलें म्हणून कवींनी सांगितलें, आतां स्वपातित्य मनांत आणून कवि आपणाविषयीं म्हणतात;—

पदान्वयः—तसाचि कसा उरलों, मी काय पतित नसे की जगन्नायकीं कृपाचि सरली असेहि न घडे, दिसलों नसेन सर्वसाक्षी रवी नयन कसा, विषाद धरिला म्हणों, सुरभी विषक्षीर नवी.

तसाचि कसा उरलों,–इतर अजामिलादि महान् पापी तुम्ही उद्धरिले,आणि मींच ~ तसाचि–तसाच–उद्धरल्याशिवाय पापी तसा पापीच कसा उरलों–कसा अवशिष्ट राहिलों, अशी आपल्या मनांत आशंका घेऊन कवि पुढे तिचें समाधान करित होत्साते त्या समाधानाचें दुर्घटत्व पुढें करून तद्वारा स्वपातित्य प्रकट करीत असतां म्हणतात,–मी काय पतित नसें कीं,–मी काय मुळीं पतित म्हणजे पापी नाहींच; म्हणून तसाच उद्धरल्याशिवाय उरलों, असा अन्वय, एथें 'कीं' या अव्ययाचा निश्चयार्थ जाणावा; तर हें असंभवित, कारण उद्धरल्याशिवाय उरलों म्हणून मी पतित नाही असें म्हणतां यत नाही; अथवा, 'कीं' याचा निश्चयार्थ न करितां 'कीं' म्हणजे 'किंवा' असा पक्षांतरबोधक अर्थ करून पुढल्या वाक्याशी त्या अव्ययाचा अन्वय लाविला असतांहि प्रशस्त.बरें आणखी ~ जगन्नायकीं कृपाचि सरली असेंहि न घडे,–जगन्नायकी,–जगत्–म्हणजे भ्रमण करणारें जें हें सारें भवचक्र त्याचा~ नायक–नियंता–चालविणारा जो तू~अर्थात् विश्वचालक–सर्व विश्वाचा नियंता–जो तू त्या तुझ्या ठायी, कृपाचि सरली–म्हणजे कृपेचें भांडवल होतें तें संपलें असें हि नघडे,–असेंहि घडत नाहीं–असेंहि सुतराम् संभवत नाहीं–अर्थात् कृपेची न्यूनता संभवत नाहीं, ·मग तिचा समूळ अभाव तर केवळ अघटित, असा एथें 'चि' या अव्ययानें ध्वनितार्थ होतो. तर हें कारणहि असंभवित. एथें जगन्नायक हें हेतुगर्भ पद होय; कारण, जर तूं जगन्नायक आहेस तर तुझ्या ठायीं कृपेचा अभाव संभवत नाहीं कदाचित् एथें कोणी आशका घेईल कीं, भगवंताचें जगन्नायकत्व, आणि त्याचे कृपेची सत्ता, या दोन गोष्टींचें साहचर्य जें एथें स्वीकृत केलें तें प्रमाणापेक्ष आहे, तर त्यानें असें समजावें कीं, ज्यापेक्षां आनंदोत्पत्ति हें भवचक्रचालनव्यापाराचें फल गम्यमान आहे, आणि याविषयीं–'आनंदाद्ध्येवखल्विमानिभूतानिजायंतेआनंदेनजातानिजीवंति' इत्यादि श्रुतीचें

प्रमाणहि प्रसिद्ध आहे, आणि जगज्जननपालनादि व्यापारास भगवंताच्या सदयतेची अपेक्षा आहे, त्यापेक्षां त्या आनंदाचा मूलजनक अथवा आनंदरूपच जो भगवान् त्याच्या ठायीं सदयता सांसिद्धिक आहे हें सिद्ध; म्हणून ती सदयता असल्यावांचून त्या आनंदाची प्राप्ति जीवांस अशक्य, अतएव, '**जगन्नायक**' हें एथें स्पष्ट हेतुगर्भ पद होय. अर्थात् कवि भगवंतास म्हणतात कीं, ज्यापेक्षां तू जगन्नायक आहेस, त्यापेक्षां तू कृपावंतही आहेस, म्हणून तुझी 'कृपा सरली' असें म्हणतां येत नाहीं. आणखी कदाचित् तू म्हणशील की, कोट्यावधि जीवांमध्यें तू मला दिसला नसशील, तर कवि म्हणतात मीं-**दिसलों नसेन सर्वसाक्षी रवी नयन कसा**,-दिसलों नसेन-तुझ्या दृष्टीस पडलों नसेन, अथवा त्वां मला पाहिलें नसशील असे जर म्हणावे तर हेंहि संभवत नाही, कारण मग-**सर्व-साक्षी रवी नयन कसा**,-**सर्वसाक्षी**,-सर्व-मेरूपासून अणुरेणु त्रसरेणूपर्यंत स्थूल सूक्ष्म पदार्थ त्यांचा-**साक्षी**-म्हणजे पाहाणारा जो-**रवी**[1]-सूर्य तो-**नयन**-अर्थात् तुझा **नयन**-नेत्र-डोळा **कसा**-म्हणावा; अर्थात् जर मला पाहात नाहीं तर श्रुति-स्मृतींत सूर्य तुझा नेत्र म्हणून सांगितला आहे[2] तो कसा ? अर्थात् कवि भगवंतास

---

१ कदाचित् एथे कोणी बारीक शका घेईल की, मोरोपत महान् पंडित असून त्याचे काव्य महाराष्ट्र व्याकरण नियमास सोडून क्वचित् आढळते, असे असतां त्यांहीं '**रवी**' हा शब्द न्हस्वस्वरान्त असता एथे दीर्घस्वरान्त कसा लिहिला ? त्यास, एकतर या प्राकृत भाषेत सस्कृताप्रमाणें न्हस्वदीर्घत्त्वाचा नियम सर्वत्र घट्ट राहू शकत नाही; दुसरे, चरणाच्या शेवटला वर्ण तर पुढील किवा मागील चरणाच्या प्रासाच्या अनु-रोधाने निरतर दीर्घच असतो यावरूनहि या आशकेचे समाधान झाले असे कोणास वाटेल, तर अशा सूक्ष्म पाहाणाराचे समाधान करण्याकरिता मला आणखी थोडा यत्न केला पाहिजे, तो असा की,-मोरोपतानी एथे भगवंताच्या एकाच नेत्राचे रवित्व उद्देशिलें नसून दोन्ही नेत्रांचे रवित्व पृथक् पृथक् प्रदर्शित केले आहे, म्हणून दोन रवीचे ग्रहण झाल्याने संस्कृत भाषेच्या नियमाप्रमाणे एथे **रवी** हा द्विवचनान्त शब्द जाणावा आतां अशा सूक्ष्म पाहाणारानी '**नसेनदिसलोंकसेनयनसर्वसाक्षीरवी**' असा पाठ म्हणून आपले समाधान करून घ्यावे

२ सूर्य, चद्र हे भगवताचे नेत्र म्हणून श्रुतिस्मृतीत पुष्कळ ठिकाणी वर्णन आढळतें.

अग्निर्मूर्द्धाचक्षुषीचंद्रसूर्यौ

—श्रुति.

चंद्रमामनसोजातश्चक्षो सूर्योअजायत

—पुरुषसूक्त

म्हणतात, सूर्य तुझा नेत्र असल्यावर मग मी तुला दिसलों नसेन हेंहि संभवत नाहीं.

यस्यभासासर्वमिदविभाति

—श्रुति

यदादित्यगततेजोजगद्भासयतेऽखिलम् ।
यच्चद्रमसियच्चाग्नौतत्तेजोविद्धिमामकम् ॥

भ. गी. अ. १५, श्लोक० १२.

अनादिमध्यान्तमनतवीर्यं । अनतबाहुंशशिसूर्यनेत्रं ।
पश्यामित्वादीप्तहुताशवक्त्रं । स्वतेजसाविश्वमिदंतपतं ॥

भ. गी. अ ११, श्लोक १९

ऋद्ध स्पष्टाक्षरोमत्रश्चंद्रांशुर्भास्करद्युति·

वि स. ना., श्लोक ३०

उदीर्ण सर्वतश्चक्षुरनीश·शाश्वत स्थिर

—श्लोक ६७

रविर्विरोचनःसूर्य सवितारविलोचन

—श्लोक ९४

यस्याग्निरास्यद्यौर्मूर्द्धाखंनाभिश्चरणौक्षिति· ।
सूर्यश्चक्षुर्दिश· श्रोत्रेतस्मैलोकात्मनेनमः ॥

भी स्त. श्लो ७०

दिशोभुजारविश्चक्षुर्वीर्यशुक्र प्रजापति·

—श्लो. ९९

३ कोठें—**नसेन दिसलों कसें** असाहि पाठ आढळतो, परंतु तो मला प्रशस्त दिसत नाही; कारण, **कसें** या शब्दाचा **नसेन दिसलों** या पदाशी जरी अन्वय केला, तरी तो जवळचा सबंध असल्याने हे क्रियाविशेषण भाषापद्धतीप्रमाणे कर्त्याच्या लिंग-वचनाच्या अनुरोधाने असावें, **'मीं दिसलों नसेन कसें'** असें म्हणण्यापेक्षां **'मीं दिसलों नसेन कसा'** ही बोलण्याची रूढि अधिक व्यापक दिसते. 'मी उभा राहिलो,' 'ती वेडी कशी,' 'ते आंधळे कसे म्हणावे,' अशीच बहुधा महाराष्ट्रभाषेत बोलण्याची रीति आढळते. ( पहा· माझे महाराष्ट्र व्याकरण, आवृत्ति तिसरी, नि० ५२१, पृ० २५२ ).

**( पुनः पूर्वपक्ष ) बरें जर-विषाद धरिला म्हणों,-विषाद-खेद-उपेक्षा-अर्थात् मजविषयी त्वां आपल्या मनांत उपेक्षा केली असे जर कवि म्हणतात आम्हीं-म्हणों-म्हणावें, तर हेंहि असंभवित. कारण-सुरभी विषक्षीर नवी,-सुरभी-कामधेनु[1] विषक्षीर-विषरूप अथवा विषमय जे क्षीर-दूध[2] तें-नवी-वीत नाही, कामधेनूच्या मनांत जरी विषाद आला, तरी ती विषाचें दूध, देत नाही[3] अर्थात् भक्तांचे मनोरथ पूर्ण करण्याविषयी तू कामधेनु**

आणखी, **कसा** हा शब्द त्या पदापासून निराळा काढून जर ते 'रवि' या शब्दाचें विशेषण केले, आणि असे करणे फार गोड, आणि प्रशस्त दिसते, तर मग **'कसा'** असेच त्याचे विशेषण असले पाहिजे कदाचित् कोणी म्हणेल की, **'नसेन् दिसलों'**या उत्प्रेक्षेचे दुर्घटत्व दाखविण्याकरिता **'कसे'** हे निराळेच प्रश्नार्थक अव्यय मानावें, त्यास, असे मानिले असता एक तर सर्व पदे त्रुटित होऊन-' हे कसें होईल ' इत्यादि पदाचा वाक्यपूरणार्थ अध्याहार करावा लागेल, तितके करूनहि पुढल्या पदाशी त्याचा संबंध नीट रहात नाही, म्हणून मला वाटते **'कसा'** हाच पाठ अधिक प्रशस्त होय.

१ सुरभिर्गविचस्त्रियाम्

—अमर.

२ दुग्धक्षीरंपय समम्

—अमर

३ एथें दूध देण्याच्या अर्थसंबधाने जरी 'विणे' या क्रियेचा प्रयोग भाषारूढीस प्रशस्त दिसत नाही, तो प्रयोग सांप्रत पशुजननाविषयींच प्रसिद्ध आहे, तरी 'विणें' म्हणजे प्रसवणें-शारीरधर्मानें उत्पन्न करणे, अशा मूळच्या सामान्य अर्थावर दृष्टि दिली असतां सांप्रतच्या प्रयोगास बाध येतो असे मला वाटत नाही. तुकोबाने या क्रियेचा प्रयोग एके ठिकाणी मनुष्यजननाच्या अर्थी केला आहे:—

कोड पुरविना बाळाची—
मग ते काशाची माऊली । जाण काशासाठी व्याली ॥

तसेंच लोकात पुरुषाविषयीहि अशाच अर्थाने म्हणण्याची रूढि आढळते,-' असा जर तो निष्ठुर होता तर मग पोरे कशाला व्याला. ' तसेच आणखी ' विणे ' या धातूचा शुद्ध ' उत्पन्न करणें ' अशा अर्थींहि प्रयोग आढळतो.

ऐसेप्रेमाचेंनिधावे । ध्यानचिध्यानातेंप्रसवे ॥

ज्ञा. अ. १३, ओ. ९६

तामसअहंकारगगनातें । गगनव्यालेपवनातें ॥
तोपवनदहनातें । **प्रसवताझाला** ॥

**वि. सिं., प्र. ३ ओ. ७३.**

आहेस, तेव्हां विषाद जरी मनांत धरिला तथापि विषाचें दूध देणार नाहीस, म्हणजे दयेच्या ठिकाणीं निर्दयतेचा अवलंब करणार नाहींस. यद्यपि ' सुरभी ' शब्द सामान्य धेनुवाचक आढळतो, तथापि विशेषेंकरून एथें कामधेनुवाचकच घेतला पाहिजे; कारण, पाहिजे तसें विकृत दुग्ध देण्याचें सामर्थ्य तिच्याच ठायीं संभवतें; इतर धेनूच्या ठायीं तें सामर्थ्य नसल्यानें तद्व्यतिरिक्त धेनूचें ग्रहण उपमेस योग्य होणार नाही. इतर गाईंस अत्यंत विषाद आला तथापि विषाचें दूध देऊं म्हटल्यासहि तिच्यानें देववत नाहीं; कामधेनु तसें दूध देण्यास समर्थ असतांहि जसें स्वकारुण्यास्तव तें ती देत नाही, तसे तदुपम करुणामय भगवानहि शरणागतांवर आपलें नैर्घृण्य प्रकट करीत नाहीं; म्हणून एथें कामधेनूच्या उपमेनें भगवंताचें भक्तवात्सल्य विशेषेंकरून प्रस्फुट होतें. अथवा,-विषाद धरिला म्हणोन,असा पदच्छेद करून विषक्षीरवी ? असा पुढला काक्वर्थ करावा; म्हणजे सुरभीनें मनांत विषाद धरिला, म्हणून ती काय विषक्षीर वी ? अर्थात् 'नवी.' अथवा,-'न' या अव्ययाचा 'वी' या क्रियापदाशी अन्वय न करितां, तें 'विषाद धरिला म्हणों' या उत्प्रेक्षेच्या समाधानार्थी उत्तर समजावें; आणि 'सुरभी विषक्षीर वी ? हा पुढला वाक्यांश काक्वर्थक करून तो त्या समाधानाच्या हेत्वर्थी मानावा.

सारांश, या केकेंत कवीनें प्रथम चरणांत स्वपातित्य, दुसऱ्यांत भगवंताचें कृपालुत्व, तिसऱ्यांत त्याचें सर्वसाक्षित्व, आणि चवथ्यांत त्याची सदयता, हीं अन्वयव्यतिरेकरूपानें वर्णिलीं आहेत असें समजावें.

---

दहनउदकाते । उदकव्यालेंपृथ्वीते ॥
यापरीपंचमहाभूतें । जनितीझाली ॥

वि. सिं., प्र. ३, ओ. ७४

२०

व्रजावनकरावयाबसविलेंनखाग्रींधरा ।
सलीलतैंमंदराख्यहिनगस्वपृष्ठींधरा ॥
वराहतनुघेउनीउचलिलीरदाग्रेंधरा ।
सुदुर्धरतुम्हांकसापतितहानकांउद्धरा ॥ ९ ॥

मागल्या केकेंत कवीने स्वपातित्य प्रकट करून शेवटीं भगवंताची सदयता वर्णिली, आतां या व पुढल्या केकेत उदाहरणांनीं त्याच सदयतेचें समर्थन करितात.

पदान्वयः—व्रजावन करावया नखाग्रीं धरा बसविलें, मंदराख्य नगाहि तै सलील स्वपृष्ठीं धरा, वराहतनु घेउनी रदाग्रें धरा उचलिली, हा पतित तुम्हां सुदुर्धर कसा, कां न उद्धरा ?

**व्रजावन करावया नखाग्रीं धरा बसविलें,—व्रजावन,**–व्रज म्हणजे गोकुल[1]–अथवा व्रजभूमि–अर्थात् उपादान लक्षणेने[2] तत्रस्थ गोधनगोपजनासहित व्रज त्याचें–अवन–रक्षण, ते गोकुलाचें रक्षण करावयाकरितां नखाग्रीं–नखाच्या अग्रभागाच्या ठायीं धरा,–धर–पर्वत[3]–अर्थसंदर्भानें उपलक्षित जो व्रजदेशीं प्रख्यात गोवर्धन पर्वत, त्याते, बसविलें–ठेविलें;–अर्थात् ज्या काळीं इंद्रानें अतिवृष्टि करून गोकुल बुडविण्याचे भय प्रदर्शित केलें, आणि जेव्हां त्या

---

१ गोमान्गोमीगोकुलंतुगोधनस्याद्गवाव्रज.

—अमर.

२ या उपादान लक्षणेचे स्वरूप विश्वनाथ कविराजानें साहित्यदर्पणात असे केले आहे की,—

मुख्यार्थस्येतराक्षेपो वाक्यार्थेऽन्वयसिद्धये ।
स्यादात्मनोऽप्युपादानादेषोपादानलक्षणा ॥

आणि या लक्षणेच्या व्याख्यानांत–'श्वेतो धावति' म्हणजे पांढरा धांवतो, अर्थात् पांढऱ्या रंगाचा जो घोडा तो धांवतो; तसेंच 'कुंताः प्रविशन्ति' म्हणजे भाले शिरतात, अर्थात् भाले घेऊन शिपाई शिरतात. तसेंच एथे 'व्रजाचे रक्षण' म्हणजे व्रजसहित व्रजस्थ जे गोपादि त्याचे रक्षण. या लक्षणेस अजहत्स्वार्था अशीहिं लक्षणा म्हणतात.

३ महीध्रेशिखरीक्ष्माभृदहार्य्यधरपर्वताः

—अमर

भयानें सर्व व्रजवासी लोक तुला शरण आले, त्या काळीं दयार्द्रांतःकरण होत्साता त्वां गोवर्धन पर्वत आपल्या कनिष्ठिकेच्या अग्रभागीं छत्राप्रमाणें धरून त्याच्या अधोभागी त्यांचें त्वां रक्षण केले, आणि तेव्हांपासून तूं गोवर्धनधारी असें प्रसिद्ध नाम पावला आहेस. कदाचित् तू म्हणशील की, इतक्या व्रजाचें रक्षण करण्याकरितां अलिकडेस एक लहानशी टेंकडी म्यां उचलिली, यांत कांहीं मोठासा पराक्रम केला असें नाही; त्यास आणखी ऐक – **मंदराख्य नगहि तैं सलील स्वपृष्ठीं धरा,**—मंदराख्य-मंदर आहे-आख्या-नांव ज्याचें तो-मंदराख्य ( बहुव्रीहि समास )-पुराणप्रसिद्ध मंदराचल नगपर्वत हि स्वपृष्ठीं–आपल्या पृष्ठी-म्हणजे पृष्ठभागाच्या ठायीं–अर्थात् कच्छपरूप होऊन आपल्या पाठीवर सलील–लीलासहित होत्साता–अथवा सहज लीलेनें ( हें क्रियाविशेषण अव्यय[1] ) धरा–धारण करा ( प्राचीन ग्रंथभाषेत हा भूतकाळ जाणावा ). एथें 'हि' या शब्देंकरून गोवर्धनापेक्षां मंदराचल अति मोठा पर्वत असतांहि सहज लीलेनें त्वां तो पाठीवर धरिला, असे पराक्रमातिशयवर्णन ध्वनित होतें कदाचित् तू यांत आणखी म्हणशोल की, मंदराचल गोवर्धनापेक्षां मोठा पर्वत होता खरा, परंतु तो उचलायास मला अंगुलीच्या ठिकाणीं आपल्या पाठीचा नेटावा द्यावा लागला, तेव्हां यांत कांही अधिक पराक्रमाचे वर्णन झालें असें नाहीं त्यास आणखी ऐका–**वराहतनु घेउनी रदाग्रें धरा उचलिली,**–वराहतनु,–वराह–डुकर–अर्थात् यज्ञशूकर त्याची–तनु–देह–शरीर, घेउनी–घेऊन–अर्थात् वाराह अवतारीं यज्ञशूकरतनु धारण करून आपल्या–रदाग्रें,–रद–दांत[2], त्याचें–अग्र–अग्रभाव–टोंक त्याणेंकरून धरा–पृथ्वी[3] उचलिली–उचलली–उद्धरली; अर्थात् ही एकापेक्षां एकाधिक अशा मोठया पर्वताची

---

१ आपल्या कवीनें ज्याप्रमाणे एथे 'सलील' या शब्दाचा क्रियाविशेषणाप्रमाणें प्रयोग केला आहे, तसाच मला वाटते वामन पंडितांनी पुढल्या श्लोकात 'अतिविकळ' या पदाचा प्रयोग केला आहे.

वदेभामाकोपेंअतिविकळचाऊनिअधरा ।
धरापृष्ठीनाहीठकतुजअसाअंबुजधरा ॥
—भामाविलास

२ रदनादशनादंतारदास्तालुतुकाकुदं
—अमर.

३ क्षमाशांतिःक्षमाधरा
—विश्व.